धमाल विनोदी नाटक

# शोधू



# कुठे प्रिया

संदीप शांताराम सुर्वे

ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करीत आहे

# संदीप शांताराम सुर्वे

लिखित

दोन अंकी **विनोदी** नाटक

# शोधू कुठे प्रिया

# शोधू कुठे प्रिया

हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

म्हणून हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि संपूर्ण समाज सतत एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

शोधू कुठे प्रिया (दोन अंकी विनोदी नाटक)

संदीप शांताराम सुर्वे

पत्ता- मुंबई

फ़ोन : 9987311359 किंवा 9324466129

मेल : sandeepsurve25@gmail.com

या पुस्तिकेतील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे . तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक--- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

प्रकाशन : ५ सप्टेंबर २०१८

©esahity Pratishthan®2018

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध
- आपले वाचून झाल्यावर आपण फॉरवर्ड करू शकता
- हे पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचना व्यातिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी आवश्यक आहे.

# संदीप शांताराम सुर्वे



.

लेखक – दिग्दर्शक - गीतकार.

नेहमी काहितरी वेगळं लिहावं हिच धडपड. शाळा कॉलेजपासून या क्षेत्राची चढलेली झिंग आजही तितकीच बेभान करते आणि फक्त लिहित जातो. मुंबईमधे जन्म झाला. शिक्षण व पोटापाण्याची धडपड इथेच केली. गेली काही वर्ष शूटींग निमित्ताने देशाच्या कानाकोपर्यात जावे लागते. पण मुंबईची ओढ पुन्हा इथेच घेऊन येते. मी कोकणातला.. पण महाराष्ट्रातील विविध मराठी उपभाषा आणि त्यासोबतच हिंदी, गुजराती, तेलुगू सारख्या अनेकविध भाषांमधे लिखाण करण्याचे भाग्य माझ्या नशिबी आले त्यासाठी देवाचे आभार. कोणतेही लिखाण करताना त्या कथेतील प्रत्येक पात्र मी जगतो. त्यांच्या श्वासाशी एकरुप होतो म्हणूनच मला त्या पात्राचा.. त्या कथेचा आनंद घेता येतो. रसिकांचे प्रेम हिच माझ्या लिखाणाची उर्जा. रसिकांनी

दिलेली दाद मिळते आणि मग अजून काहितरी लिहावेसे वाटते. आपल्या आसपास घडणार्या अनेक गमती जमती मी माझ्या लिखाणात सहजतेने वापरतो आणि प्रेक्षकांना ते आवडतेदेखील. असेच आपण भरभरुन प्रेम करावे आणि असेच मी भरभरुन लिहित राहावे.

रामचंद्र सडेकर, चंद्रशेखर फणसळकर, पु.ल. देशपांडे, सुरेश भट, राम लक्ष्मण, अशोक पत्की, संजय बेलोसे हिच या क्षेत्रातील माझी स्फुर्तीस्थाने.. माझी दैवतं. यांना मनापासून वाचलं..ऐकलं.. त्यांच्यावर प्रेम केलं म्हणूनच लेखणीशी माझं नातं जुळलं.

मी लिहिलेल्या अनेक नाटक, मालिका तसेच चित्रपटामधून अनेक जेष्ठ व श्रेष्ठ कलाकारांनी काम केले आहे. मी लिहिलेल्या गीतांना सुरेशजी वाडकर, सुदेशजी भोसले, साधना सरगम, वैशाली माडे, केतकी माटेगावकर, कौशिक देशपांडे, सिद्धांत सुदेश भोसले, महेश राव अश्या स्वरसम्राटांनी आपला सुमधुर आवाज दिला आहे. अजून बराच पल्ला बाकी आहे व तो गाठण्यासाठी आपली कौतुकाची थाप खूप महत्वाची.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9324466129
Sandeepsurve25@gmail.com

**मनोगत**

रसिक वाचकांचं प्रेमच इतकं मोठं असतं की लेखकाची लेखणी मग अविरत लेखन करीतच राहते. कधी विनोदी, कधी गुढलेखन, कधी रोमॅन्टिक तर कधी अतिशय हलकं फुलकं असं अनेक अंगी लिखाण करणं मला आवडतं. माझ्या प्रत्येक लिखाणाला रसिकांनी आजवर जी पसंती दिली त्यामुळेच ही नवनवीन लिहिण्याची स्फूर्ती येते.

चित्रपट, मालिका, गीते लिहिताना माझ्या लेखनाची सुरुवात ज्या एकांकिका व नाटकांनी केली त्या सर्व एकांकिका व ती सर्व नाटके माझ्यासाठी अनमोल आहेत. **“यातुनच घडलो.. यातूनच बिघडलो.. म्हणूनच मित्रांनो... तुम्ही भी घडा ना.. तुम्ही बि..घडाना.”**

नाटक लिहिताना व ती दिग्दर्शित करताना जे सुख मिळतं त्याची तुलना कशाशीच होऊ शकत नाही. **“माझं पहिलं प्रेम.. माझं वेड.. म्हणजे रंगभूमी...”** म्हणूनच हे नाट्यपुष्प आपणा नाट्यवेड्यांसाठी सादर.

लेखक : संदीप शांताराम सुर्वे.
भ्रमणध्वनी : 9324466129
Sandeepsurve25@gmail.com

**<u>अर्पणपत्रिका</u>**

साहित्यकारांना साहित्यप्रेमींपर्यंत पोहोचवित अनेक रसिकांची साहित्यभुक भागविणाऱ्या निस्वार्थ वृत्तीने कार्य करणाऱ्या

## ‘ ई साहित्य प्रतिष्ठान’

या प्रकाशन संस्थेस
सदर पुस्तक
समर्पित.

संदीप शांताराम सुर्वे.
मुंबई.

# शोधू.



कुठे प्रिया..

# पात्र परिचय

| | | |
|---|---|---|
| समाधान | : | वय ३० |
| प्रिया | : | वय ३० |
| नेहा | : | वय २५ |
| प्रसाद | : | वय ३० |
| कमळी | : | वय ३५ |
| रावसाहेब | : | वय ५० |
| इन्स्पेक्टर | : | वय ४० |
| पेपरवाला | : | वय २० |
| सोनार | : | वय ४० |

## अंक पहिला

### प्रवेश 1

(मेल धडधडत जाण्याचा आवाज येतो. आवाज विरळ झाल्यावर हळूहळू प्रकाश येतो व रेल्वेची ट्रेन येण्याची अनाउन्समेंट ऐकू येऊ लागते. सांताक्रूझ स्टेशन. प्लॅटफॉर्म नं. १ च्या इंडिकेटर खाली बाकड्यावर एक मुलगी बसलेली आहे. आणि ती कुणाला तरी फोन करीत आहे. ती खूप वैतागलेली आहे कारण तिचा फोन लागत नाही.)

प्रिया : किती वेळ झाला.. याचा फोन लागत का नाहीये..? कुठे जावून बसलाय देवालाच माहित. केव्हापासून ट्राय करतेय. इतका वेळ नॉट रिचेबल..? (पुन्हा फोन लावते. फोन लागतो.) अरे हेल्लो काय.. किती वेळ झाला तुला कॉल करतेय..? तू तोंड बंद ठेव. आणि मी काय विचारतेय ते सांग आधी. इतका वेळ तुझा मोबाइल नॉट रिचेबल कसा होता.. तू निघाला नाहीस का अजून ऑफिसमधून? अरे अर्धा तास झाला तुला फोन लावतेय. पण तुझा पत्ताच नाही. कुठे ठेवला कुठे होतास फोन तू.. सांग पटकन मला आधी..?

समाधान : तू जर मला बोलायला दिलंस तरच मी बोलेन ना गं. केव्हाची तूच बोलतेयस भडाभडा.

प्रिया : तू बोलतेयस म्हणजे काय. अरे साडे सात वाजले. अजून मी इथेच तुझी वाट पाहतेय. तुझा तर पत्ताच नाही आणि तू वर मलाच बोलतो आहेस कि मी भडाभडा बोलतेय म्हणून. असे कसे रे तुम्ही सगळे पुरुष वेंधळे..?

समाधान : ए.. सगळे पुरुष म्हणजे काय.. अजून कोण आहे वेंधळा तुझ्या नजरेत..

प्रिया : नको तिथे डोकं नको चालवूस हा. सगळे म्हणजे माझा कुणी दुसरा बॉयफ्रेंड वैगैरे नाही आहे. समजलं ना. मूर्ख कुठला. आता फालतू बडबड बंद कर आणि पटकन ये. डोकं भणभणायला लागलंय इथे आवाजाने.

समाधान : आधी मला सांग..?

प्रिया : तू येतो आहेस कि मी जाऊ..?

समाधान : हो आलोच. आता येऊनच बोलतो तुझ्याशी. म्हणे वेंधळे..

प्रिया : हो. ये हो.. सवाल जवाब खेळूया.. आमने सामने..

समाधान : आलोच.

प्रिया : हो. येच तू.

समाधान : नाही मी आलोच.

प्रिया : हो येच, मी पण थांबलेय..

समाधान : हो थांब आलोच.

प्रिया : तुला नारळ देऊ का आता यायला..? केव्हापासून आलोच आलोच लावलंय.. अरे मी बहिरी आहे कि तू मुका आहेस... आता ठेव फोन आणि ये.

समाधान : पण कुठे भेटायचे माहित आहे ना तुला..?

प्रिया: अरे रोज इथेच भेटतो ना आपण. तू वेडा आहेस का रे..

समाधान : आधी मला सांग तू नक्की कुठे उभी आहेस..? तुमचा बायकांचा काही भरवसा नाही.. आजूबाजूला कुठल्या बायकांच्या तोंडून ऐकलं कि साड्यांचा सेल लागलाय कि एका क्षणात गायब व्हाल जागेवरून.

प्रिया : हो का..? मी सांताक्रूझ स्टेशन प्लाटफॉर्म नं. १ च्या इंडिकेटर खाली बाकड्यावर बसलेली आहे. कळाले का..? आणि तू बहिरा आहेस का रे.. तुला इथे रेल्वेची अनाउन्समेंट ऐकायला येतेय कि साड्यांच्या सेलची.. एक काम कर तू ये आरामात... मी चालले.

समाधान :  अगं थांब, मी १५ मिनिटात पोहोचतो तिथे. (तो फोन कट करतो.)

प्रिया :  (ती इकडून तिकडे फेऱ्या मारीत स्वतःशीच बोलू लागते.) देवा, काय होणार रे माझं..? कसा हा नेमका माझ्याच नशिबात पडला.. ह्याच्या बरोबर राहण्यापेक्षा बोलाव मला तुझ्याकडे. सुटेन मी एकदाची.

(जोराचा बॉम्ब फुटल्याचा आवाज होतो. काळोख. शांतता..)

स्टेजवर काळोख आहे.. मागे लोकांचा आरडा ओरडा ऐकू येऊ लागतो.. न्यूज रीडरचा आवाज., “ **मन हेलावणारी एक ब्रेकिंग न्यूज नुकतीच हाती आलेली आहे.. सांताक्रूझ स्टेशन प्लाटफॉर्म नं. १ च्या इंडिकेटर खाली नुकताच एक भीषण ब्लास्ट झाला आहे. आणि संध्याकाळी ऐन गर्दीच्या वेळी झालेल्या या स्फोटामध्ये अनेक लोक मृत्युमुखी पडले असून कितीतरी जखमी झाल्याचे वृत्त नुकतेच हाती आले आहे.** “ हळूहळू आवाज कमी होत जातो..

## प्रवेश 2

(हळू हळू प्रकाश. घरचा हॉल दिसू लागतो. तो तिच्या आठवणीत आहे. एका लग्नाची दुसरी गोष्टचे " **तुझ्या विना** " गाणे सुरु होते. ती अलगद येते. त्यावर दोघांचा सुंदर रोमांटिक डान्स सुरु होतो. तो टी शर्ट आणि ट्रक प्यांटवर आहे. ती साडी व स्लीवलेस ब्लाऊजमध्ये आहे.. गाणे संपताना ती त्याला बेडरूममध्ये नेते व बेडवर झोपविते. आपल्या साडीचा पदर त्याच्यावर फिरवून निघून जाते गाणे संपते आणि तो घाबरून झोपेतून उठतो. बाजूच्या टेबलवर ठेवलेलं पाणी तो पितो व आपला घाम पुसतो. टेबलवरचा तिचा फोटो उचलतो.)

समाधान : प्रिया, आय एम सॉरी प्रिया. त्या दिवशी मी लेट झालो नसतो तर. तर आज आपण एकत्र असतो. तुझ्या आठवणीशिवाय एक क्षणही जात नाही गं. का सोडून गेलीस तू मला.. प्रिया.. (मोठ्याने रडू लागतो..) प्रिया.. कुठे शोधू गं मी तुला..? सांग ना..? सांग ना गं..? (अचानक रडता रडता त्याचा चेहरा बदलू लागतो.) सांग ना प्रिया..? कुठे गेलीस तू.. त्या ब्लास्टमध्ये तुझी डेड बॉडी पण नाही सापडली. जोपर्यंत तुझी डेड बॉडी सापडत नाही तो पर्यंत टेन्शन आहेच ना गं मला. देवाच्या दयेने बॉम्ब ब्लास्ट झाला आणि

माझ्या नवी सुखे पाहणाऱ्या जीवनातील काटा कसा अलगदपणे दूर झाला.. (फोटो पुन्हा टेबलवर ठेवतो. दारूची बाटली काढतो आणि पेग बनवितो.) चिअर्स प्रिया.. माझ्या नवीन सुखी लाईफबद्दल. (इतक्यात दरवाजाची बेल वाजते. तो ग्लास फ्लावरपॉटच्या मागे ठेवतो आणि जाऊन दरवाजा उघडतो. भाजीवाली कमळी आत येते.)

कमळी : नमस्ते साहेब, मी कमळी. नाही ओळखलं का मला.. आता बघा ना तुम्ही कसे ओळखणार मला. (लाजत) आपण भेटलोच नाही ना कधी. (तो बावरतो.) ते म्हणजे मी भाजीवाली कमळी. बाईसाहेब माझ्याकडूनच भाजी घेतात ना नेहमी. केव्हा केव्हा तर मीच आणून देते तुमच्या घरी. ताजी ताजी भाजी. बाईसाहेब नाही आहेत का घरी.. चार दिवस झाले भाजी आणायला नाही आल्या..? त्या आजारी असतील तर तुम्ही सांगा कोणत्या कोणत्या भाज्या आणू मी. पटकन घेऊन येते दोन मिनिटात.

समाधान : नाही भाज्या नकोत. ती नाहीये घरी. माहेरी गेलेय ती. ती आली कि सांगतो तुम्हाला. म्हणजे ती येइलच ना तुमच्याकडे भाजी न्यायला. आता नकोय मला भाजी. मी रोज बाहेरच जेवतो सध्या.

कमळी : अहो साहेब, मी भाजी विकायला नाही आलेय. ते ह्या बाई मार्केटमध्ये.. अरे बाईला मी बाहेरच ठेवलं.. एक मिनिट हा..

(बाहेर जाऊन एका सुंदर मुलीला घेऊन येते. तिला पाहून तो दचकतो.) हा तर, ह्या मार्केटमध्ये तुमचा पत्ता विचारत होत्या. नेमका पत्ता माझ्या हातात. मग मी म्हंटलं कि जावं आपणच. हयांचं पण काम होईल आणि आपलं पण काम होईल. (तो प्रश्नार्थक) म्हणजे बाईसाहेबांना पण भेटेन ना मी. असू दे. असू दे. तुम्ही ह्यांना भेटा. म्हणजे. बाई तुम्हाला ह्यांनाच भेटायचं होतं ना.. (ती मानेने हो म्हणते.) अहो मग भेटा कि, अश्या अनोळखी असल्यासारख्या काय वागताय? (भुवया उडवीत) ओळख आहे ना साहेबांशी..?

समाधान : कमळीबाई, तुम्ही या आता. थॅन्क्स. आमचा परिचय आहे चांगला. म्हणजे नातेवाईक आहे त्या माझ्या.

कमळी : असू दे. असू दे. परिचय महत्वाचा असतो नेहमी.. पण काय कुणी तरुण बाई तरुण पुरूषाचं नाव विचारते तर लोकांना गडबड वाटते ना थोडी. त्यात आमच्या बाईसाहेब पण नाही दिसत घरात… म्हणजे...

समाधान : (रागावत) कमळीबाई तुम्ही या आता.

कमळी : हो येते मी. संध्याकाळी भाजी घेऊन येऊ का थोडीशी?

समाधान : नाही नको. मी सांगितलं ना कि मी बाहेरच जेवतो सध्या. तुम्ही या.

कमळी : हो. येते मी.

समाधान : या. (ती जाते. जाताना ती सारखी मागे तिच्याकडे संशयाने पाहत असते. तो रागाने पाहत दरवाज्याच्या दिशेने तिच्यामागे जातो. ती निघून जाते. तो दरवाजा बंद करतो. आणि पटकन वळतो.)

समाधान : नेहा, तू इथे का आलीस? तुला काही कळतंय का कि मी तुला काय विचारतोय ते? तू इथे का आलीस?

नेहा : का आलीस म्हणजे? एकतर तू फोन बंद करून बसला आहेस आणि आता ती नाहीये ना. ती नाहीये तर मग तिच्या जागी मीच आहे ना तुझ्या आयुष्यात. ए. बायको मेल्याच्या आनंदात मला विसरलास नाही ना? (तो जाऊन फ्लॉवर पॉटच्या मागचा ग्लास काढून पिऊ लागतो.) अरे वाह.. मस्त सेलिब्रेशन चाललंय तुझं इथे आणि मी मात्र उगीचच तुझी काळजी करतेय तिकडे.

समाधान : तू इथे नाही यायला पाहिजे होतंस. आणि नेमकी तू पत्ता विचारायला पण त्याच भाजीवालीकडे गेलीस. सगळी गडबड करून टाकली आहेस तू. आता ती गावभर बोंबलत बसेल. ह्या बायकांना दुसरा काही कामधंदा नसतो, दुसऱ्यांच्या घरच्या चांभार चौकश्या करण्याशिवाय.

नेहा : Excuse me. मीही एक बाई आहे… (तो गडबडतो.) आणि मी कसली गडबड केली? नाहीतरी आपण ठरवलंच होतं ना कि तू

तुझ्या बायकोला डिवोर्स दिलास कि आपण लग्न करायचं म्हणून. मग काय फरक पडतोय. (ती जाऊन त्याच्या गळयात हात टाकते.) आपल्या प्रेमात खूप ताकद आहे. म्हणूनच मी तुझ्या आयुष्यात आल्या आल्या ती तुझ्या आयुष्यातून निघून गेली. आता आपण मस्त पटकन लग्न करून टाकू.

समाधान : ये लग्न करून टाकू काय? भातुकलीचा खेळ आहे का लग्न करणं म्हणजे..

नेहा : काय म्हणालास? भातुकलीचा खेळ आहे का? म्हणजे तुला माझ्याशी लग्न नाही करायचं आहे का? टाईम पास करत होतास का इतके दिवस माझ्याशी तू?

समाधान : उगाच काहीही बडबडू नकोस गं. हे बघ, जरा शांत डोक्याने विचार कर. चार दिवसांपूर्वी बॉम्ब ब्लास्ट झाला. प्रिया जेव्हा माझ्याशी बोलत होती तेव्हा ती नेमकी त्याच ठिकाणी होती पण अजूनही तिचा काहीएक पत्ता नाही. तिची डेड बॉडी मिळाली असती तर सगळे प्रश्न सुटले असते. मी नुसतं कुणाला असं सांगितलं कि ब्लास्टच्या वेळेस ती तिथेच होती आता कुठे आहे माहित नाही तर वेड्यात काढतील मला सगळे. आणि लगेच जर तुझ्याशी लग्न केलं ना तर सगळयांचा असाच समज होईल कि मीच तिचा खून वगैरे... (तो टेन्स. बावरतो.) हे बघ काही दिवस आपल्याला दूर राहावंच लागेल.

नेहा : दूर राहावं लागेल म्हणजे.. मला काही माहित नाही हा. आपण लग्न करू. मी मस्त इथेच राहीन तुझ्यासोबत. खूप खूप मज्जा करू आपण.

समाधान : मज्जा करू.. हे बघ नेहा लहान मुलासारखं करू नकोस. थोडे दिवस थांब. सगळं काही शांत होऊ दे. मग लगेच आपण लग्न करू.

नेहा : ठीक आहे. लग्न नंतर करू पण मी इथेच राहणार तुझ्यासोबत. मी ऑलरेडी घर सोडून आलेय. माझं लग्न ठरलंय म्हणून मी पळून आले. बाबांना पत्र लिहिलं मला शोधू नका. मी माझ्या आवडीच्या मुलासोबत लग्न करून चाललेय. आणि मग मी पटकन इथे निघून आले. मला आता तुझी कोणतीही सबब ऐकायची नाही.

समाधान : अगं पण तुला कुणी इथे पाहिलं तर..

नेहा : किती घाबरतोस रे..? आणि म्हणे तुझ्यासाठी हे करेन आणि ते करेन. प्रियाचं कपाट कुठेय..? (हसते.) मी पण किती वेडी आहे बघ. ऑफकोर्स तुझ्या बेडरूम मधेच असेल ना. हो ना? (तो होकारार्थी मान डोलावतो. ती बेडरूममध्ये जाते. तो तिच्या मागून जातो. ती गाणे गुणगुणत कपाटातून काही हेंगरला लावलेल्या साड्या काढते.) मस्तच..

समाधान : काय..?

नेहा : अरे बुद्धू, काय म्हणजे काय? आता प्रिया नाही म्हंटल्यावर जसा तू माझा आहेस तश्या प्रियाच्या सर्व वस्तूंवर माझाच अधिकार आहे ना? (तो तिच्याकडे पाहतच राहतो. तिला ड्रावरमध्ये एक डबी मिळते. त्यात मंगळसूत्र असते.)

नेहा : वॉव.. लवली.. काय मस्त मंगळसूत्र आहे. नवीन केलेलं दिसतंय. वेरी नाईस. आता कामाला येईल. (ती मंगळसूत्र गळयात घालू लागते.)

समाधान : ए .... काय करते आहेस. अगं माझ्या बायकोचं आहे ते. (ती त्याच्याकडे रागाने पाहते.) म्हणजे, प्रियाचं आहे ना ते आणि आपलं लग्न नाही झालं ना अजून... मग. तू डायरेक्ट मंगळसूत्र गळयात घालणं म्हणजे.. ते आपण लग्न करू तेव्हा घाल ना तू ते गळयात.

नेहा : समू, जस्ट चिल. तू बाथ नाही घेतलेला दिसत अजून. जा तू बाथ घेवून ये. मी मस्त काहीतरी चमचमीत बनविते. पास्ता बिस्ताचं काही पेकेट आहे का रे घरात?

समाधान : चिकनमध्ये असेल. आपलं. किचनमध्ये असेल. सगळं सामान मागच्या आठवड्यातच भरलं होतं आम्ही.

नेहा : आम्ही मिन्स? तू पण जात होतास का तिच्याबरोबर घरचं सामान भरायला? (तो गडबडतो.) हाऊ कूल.. ये आपण पण असंच जायचं

हा. मस्त खूप खूप शॉपिंग करायची आणि रात्री कुठे तरी मस्त कॅंडल लाईट डिनर. खूप छान स्वप्न पाहिली आहेत मी तुझ्यासोबत मॅरिड लाइफ़ची. आता सगळी खरी करायची. (ती मंगळसूत्र गळयात लागते. तो बाजूच्या टेबलावरचा टॉवेल घेवून घाम पुसतो.) ए. तुला घाम का फुटलाय? तुला हेच टेन्शन आहे ना कि इथे मला कुणी पाहिलं तर. डोन्ट वरी. मी घरातून बाहेर पडणारच नाही. मला नाही वाटत तुझ्याकडे जास्त कुणी येत असेल आणि जर आलं तर मी बेडरूममध्ये लपून बसेन.

समाधान : आणि तुझे बाबा?

नेहा : बाबांचं टेन्शन नको घेऊस. मी जे लिहायचं ते लिहिलंय पत्रात. (तो तिच्याकडे पाहत असतो.) अरे असा काय पाहतो आहेस? तब्बेत ठीक आहे ना तुझी? आयडीया आवडली नाही का तुला..?

समाधान : (पुन्हा घाम पुसतो.) काय काय विचार करून आली आहेस गं तू.. माझ्या कानातून ना गरम गरम हवा निघायला लागलेय.

नेहा : तू जा. मस्त थंड थंड पाण्याने आंघोळ कर. म्हणे गरम गरम हवा निघतेय कानातून.

(टॉवेल त्याच्या गळयात टाकते आणि त्याला ढकलत बाथरूममध्ये पाठवते. आणि गाणे गुणगुणत घर पाहत असते.) नाइस फ्ल्याट. (इतक्यात दरवाज्याची बेल वाजते. ती दरवाजा

उघडायला जात असते. तो टॉवेल घातलेल्या अवस्थेतच धावत बाहेर येतो आणि तिला थांबवतो.)

समाधान : नेहा, काय करतेयस तू हे..

नेहा : काय म्हणजे.. अरे दरवाजा उघडते आहे मी.

(तो कपाळावर हात मारतो.)

समाधान : अगं तू इथे आहेस हे कुणाला कळलं नाही पाहिजे. तू आत बेडरूममध्ये जा आधी. मी पाहतो कोण आहे ते.

नेहा : तू असा टॉवेल गुंडाळून दरवाजा उघडणार आहेस का?

समाधान : तू जा ना आत. मी टॉवेल गुंडाळून उघडेन किवा टॉवेल सोडून उघडेन.. तू जा आधी आत.

नेहा : (लाजते.) इश्श..

समाधान : इश्श.. काय इश्श.. (पुन्हा बेल वाजते. तो तिला बेडरूममध्ये पाठवतो.)

समाधान : (आतूनच) कोण आहे..

पेपरवाला : साहेब मी बारक्या. पेपरवाला बारक्या.. बिल न्यायला आलोय.

समाधान : उद्या घेऊन जा.

पेपरवाला : उद्या मी बाहेर चाललोय हो. आजच दिलंत तर बरं होईल. दरवाजा तर उघडा.

(तो दरवाजा उघडतो.)

समाधान : थांब आणतो पैसे. (तो ड्रावर मधून पैसे काढत असतो. पेपरवाला आत येतो.)

समाधान : किती आहे बिल?

पेपरवाला : काय साहेब बिल दिलं होतं ना पेपरमध्ये टाकून. म्याडम नाहीत का घरात? त्यांना विचारा त्यांनी काढून ठेवलं असेल.

समाधान : तुला सांगायचं असेल तर सांग. लपंडाव खेळायला वेळ नाहीये माझ्याकडे.

पेपरवाला : (तो डायरीमध्ये पाहतो.) एकशे श्याऐंशी रुपये.

समाधान : (दोनशे रुपये काढून देतो.) हे घे.

पेपरवाला : सुट्टे द्या ना साहेब. चिल्लरचे जाम वांदे आहेत हो आजकाल. तुमच्याकडे असेल तर बघा ना थोडीशी चिल्लर.

समाधान : थोडीशी चिल्लर.. माझ्याकडे. मी काय रोज दादर स्टेशनच्या बाहेर बसतो काय?

पेपरवाला : तुम्ही पण ना साहेब.. किती मज्जाक करता हो. म्याडम ना विचारा ना.. मी सांगतो ना त्यांनी नक्कीच काढून ठेवली असेल चिल्लर.

समाधान : ए. तू जा घेऊन दोनशे रुपये.. बाकीचे पुढच्या महिन्याच्या बिलात एडजेस्ट करून टाक.

पेपरवाला : पुढच्या महिन्यात नाही हो लक्षात राहत.

समाधान : अरे लिहून ठेव ना तुझ्या डायरीत.

पेपरवाला : माझा अक्षर चांगला नाही हो.. मग मलाच वाचता नाही येत. जाम वांदे होतात माहितेय मग.

समाधान : ये. तू जा आता बाळा. मला राग येतोय रे.. तुझ्या वांदे मध्ये माझ्या डोक्याचे कांदे पिकवू नकोस रे.

पेपरवाला : मग उद्या जाम वांदे झाले तर मला नका बोलू हा.

समाधान : इकडे दे तुझी डायरी.. मी लिहितो. माझे अक्षर खूप छान आहे. मला हि कळेल आणि तुला हि कळेल.

पेपरवाला : मला काय. घ्या डायरी आणि लिहा.

(समाधान डायरीमध्ये लिहितो.)

समाधान : जा आता.. मला आंघोळीला जाऊ दे हा बाळा. (तो जात असतो. इतक्यात नेहा आतून आवाज देते.)

नेहा : गेलं का रे कुणी आलेलं ते? (पेपरवाला पुन्हा आत येतो..)

पेपरवाला : म्याडम आहेत का घरात. विचारा ना त्यांना मग. त्यांनी बिल सुट्ट्या पैश्यासकट काढून ठेवलं असेल हो.

समाधान : (वैतागून) म्याडम आजारी आहेत. तू जा उरलेले पैसे ठेव तुलाच. आणि आता माझं डोकं सटकवू नकोस. चल पळ.. (म्हणत त्याला पकडून बाहेर काढतो आणि दरवाजा बंद करतो.)

नेहा : येऊ का रे मी बाहेर..?

समाधान : ये, ये बाहेर ये. काय इतकी घाई आहे तुला बाहेर यायची..

(ती बाहेर येते.)

मघाशी आत जायची घाई होती. आता बाहेर यायची घाई आहे.

नेहा : (ती त्याला पाहून हसायला लागते.) काय मस्त कार्टून दिसतोयस रे ह्या टॉवेलमध्ये.

समाधान : (टॉवेलने तिला मारीत) एक गुच्चा देऊ काय? आता कुणी दरवाजा तोडायला जरी आला ना तरी दरवाजा उघडायला जाऊ नकोस

बाहेर. मी लगेच आंघोळ करून बाहेर येतो. काय.. जाऊ का मी आंघोळीला?

नेहा : (लाजते.) इश्श.. असं का विचारतोयस रे..

समाधान : (कपाळावर हात मारीत) आयला, हिला कुठल्या वेळेस काय पण सुचतं.. सिचुअशन काय आणि हिच्या रीऍक्शन काय.

(तो बाथरूममध्ये निघून जातो. ती सोफ्यावर येऊन बसते. पुन्हा उठून टीवीचा रिमोट घेते आणि टीवी ऑन करते. मोठ्या आवाजात "चीपका ले सैय्या फेविकॉल से.. " हे गाणे वाजू लागते. तो पुन्हा टॉवेल गुंडाळून धावत बाहेर येतो. त्याने साबण लावलेला आहे. तिच्या सोबत नाचतो. त्याला आठवतं कि तो काय करतोय आणि तो टीव्ही बंद करतो.)

समाधान : माझे आई, एका जागेवर शांतपणे बस गं.. मला सुखाने आंघोळ तरी करायला दे जरा. डोक्याचा भो.... भो.. भोकदा करून टाकला हिने एका तासात. (ती त्याच्याकडे पाहते.) तू पास्ता बनवणार होतीस ना माझ्यासाठी.. आय मीन आपल्या दोघांसाठी.

नेहा : हो रे. विसरलेच बघ मी. बनवू का आता?

समाधान : बघ विसरलीस ना. जा पळ लगेच बनव पास्ता. म्हणजे तोपर्यंत हा समाधान निदान समाधानाने आंघोळ तरी करेल. (दोघे जातात. ती किचनमध्ये जाऊन डबे शोधत असते. हळूहळू काळोख.)

## प्रवेश 3

**(हळू हळू प्रकाश.** बेल वाजते. समाधान जाऊन दरवाजा उघडतो. त्याचा मित्र प्रसाद येतो.)

प्रसाद : चल रे बाजूला हो पटकन. Where is my sweetheart वहिनी? प्रिया कुठे आहेस? I am Back. पटकन बाहेर ये. (समाधानला) ए येडपट.. असा काय पाहतो आहेस खुळ्यासारखा. तुझा विश्वास जरी बसत नसेल ना तरी मी आलोच आहे लंडनहून रिटर्न.. आणि हेच सत्य आहे. सामान घरी टाकलं. आंघोळ केली आणि चहा प्यायला इथे आलो पटकन. अरे प्रियाच्या हातच्या चहाची चवच वेगळी रे. साल्या तुला रोज मिळते ना फुकटची चहा, तुला काय कळणार त्या चहाची किंमत. गाढव लेकाचा.

समाधान : प्रसाद, बस. तुला काहीतरी महत्वाचं सांगायचं आहे.

प्रसाद : मला काही ऐकायचं नाही आहे. मला आधी प्रियाला भेटायचंय. ती बेडरूममध्ये आहे का? (तो जाऊन बेडरूमचे दार वाजवू लागतो.) प्रिया, पटकन चहा कर आणि मस्त डोक्यावर पदर घेऊन स्टाइलमध्ये चहा घेऊन ये बाहेर. तुझा दीर आलाय आणि तुझ्या हातचा चहा प्यायला त्याला अजिबात धीर धरवत नाहीये. दोन मिनिटात जर तू दरवाजा उघडून किचनमध्ये जाऊन चहा

बनवून आली नाहीस, तर तुला माहित आहे मी कसा आहे ते. ओके.. टाईम स्टार्ट नाऊ. (तो येऊन हॉलमध्ये बसतो. ती दरवाजा उघडून किचनमध्ये जाते. समाधान टेन्शनमध्ये. प्रसाद मात्र खुश.) देखा बच्चू.. हम हम हैं. बाकी सब पानी कम हैं.. बोल आता बिनधास्त. काय बोलत होतास?

समाधान : आता काय बोलणार. आता पुढे जे काही होईल ते अल्ला मालिक. तू अजून सुद्धा बॉक्सिंगची प्रॅक्टिस करतोस का रे?

प्रसाद : का रे? आता कोणाशी भांडण झालंय तुझं? साल्या सांड झालास पण अजूनही खुरापती सुरु आहेत का तुझ्या? प्रॅक्टिस मस्त सुरु आहे. त्याच एका खेळात चेम्पिअन होतो ना. बोल कोणाला कोमचवायचा आहे?

समाधान : कोणाला काय आज माझाच नंबर आहे. मलाच कोमचव.

प्रसाद : काय म्हणालास? अरे ऐकलं नाही मी. (इतक्यात ती डोक्यावर पदर घेऊन चहा घेऊन येते.)

समाधान : चहा. चहा घे. (प्रसाद तिला पाहून उठतो.)

प्रसाद : (तिला) चहा नंतर. आधी मस्त आपला नाटकातला डान्स करायचा. नंतरच मी चहा पिणार. सम्या चल लाईट्स डीम कर आणि म्युजिक लाव पटकन आमचं फेवरेट. आर के स्टाइल पोज

आली कि लाईट्स ब्राईट झाली पाहिजे. लक्षात आहे ना? आपल्या कॉलेजच्या नाटकातला सीन.

(समाधान उठून जातो आणि मस्त रोमांटिक म्युजिक लावतो. प्रसाद तिचा हात हातात घेऊन डान्स करीत तिला आर के स्टाइल पोज देतो सम्या देवाला नमस्कार करीत लाईट ऑन करतो. प्रसाद तिचा चेहरा पाहतो. प्रियाच्या जागी दुसरी मुलगी पाहून तो तिला तशीच सोडून देतो आणि मागे होतो. ती खाली जमिनीवर पडते.)

प्रसाद : आयच्या गावात. हि कोण रे?

नेहा : मी नेहा. सम्याची आय मीन. समाधानची होणारी बायको.

प्रसाद : ये सम्या.. अरे हि येडी आहे काय? अरे काय बोलतेय काय हि? कळतंय का हिला? तुझी वाचा का बसलेय? अरे बोल ना काहीतरी? काय नाटक काय आहे हे..? आणि प्रिया कुठे आहे? सम्या मी तुला विचारतो आहे प्रिया कुठे आहे?

समाधान : प्रिया आपल्याला सोडून गेली. कायमची.

प्रसाद : म्हणजे?

समाधान : मागच्या सोमवारी सांताक्रूझ स्टेशनला झालेल्या ब्लास्टमध्ये प्रिया होती.

प्रसाद : एक आठवड्यापूर्वी झालेल्या ब्लास्ट.. (समाधान प्रसादला सर्व सांगत असतो.. मागे ब्याक ग्राउंड म्युजिक सुरु आहे. प्रसाद डोक्याला हात लावून तिथेच बसतो.)

(म्युजिक कमी होते. डोळे पुसत प्रसाद बाथरूममधे जातो. इतक्यात बेल वाजते. नेहा आत जात असते पण समाधान तिला थांबवितो.)

समाधान : थांब. मी पाहतो कोण आहे ते. मला थोडं पाणी घेऊन ये. (तो जाऊन दरवाजा उघडतो. कमळी आत येते.)

कमळी : नमस्कार साहेब. आल्या का बाईसाहेब? ते मी खाली तळ मजल्यावरच्या प्रधान बाईसाहेब आहेत ना त्यांच्याकडे भाजी द्यायला आले होते. तेव्हा म्हटलं पाहू बाईसाहेब आल्या आहेत का? हि भाजी ठेवा. तुम्हाला आवडतात ना शेवग्याच्या शेंगा. म्हणून मुद्दाम आणल्या. बाईसाहेब मागे म्हणाल्या होत्या कि तुम्हाला खूप आवडतात म्हणून. थोडं पाणी मिळेल का प्यायला? तुमची लिफ्ट बंद झालेय. चार मजले चढून आले तो जीव नुसता भारी झालाय. (इतक्यात नेहा समोरून पाणी घेऊन येते. समाधान तिच्या हातून पाण्याचा ग्लास घेतो आणि कमळीला देतो.) अरे वाह.. “ बायको गेली माहेरी.. काम करी पितांबरी. ” छान. बसून पिऊ का पाणी. ते काय उभ्याने पाणी पिऊ नये ना.

(बसून पाणी पिते.) थांक्यू हा थांक्यू.. बाईसाहेब अजून माहेरीच आहेत वाटतं. छान. (नेहाला उद्देशून) मी त्या दिवशी तुम्हाला यायचा रस्ता दाखवला इथला, तेव्हा सांगायलाच विसरले कि हाच रस्ता पुन्हा बाहेर जायचा आहे. (इतक्यात तोंड पुसत प्रसाद बाहेर येतो.) अरे वाह.. इथं कुणीतरी तिसरं बघून बरं वाटलं. मी बाई घाबरलेच होते. मला वाटलं कि घरात तुम्ही दोघंच आणि सुरु हरी भजन..

प्रसाद : आपण?

कमळी : मी कमळी. भाजीवाली कमळी. ह्या बाईना मीच ह्या घराचा रस्ता दाखवला होता दोन दिवसांपूर्वी. तुम्ही कोण म्हणायचे?

प्रसाद : मी प्रसाद.

समाधान : प्रसाद, नेहाचा नवरा. म्हणजे हि नेहा आहे ना माझी नातेवाईक तिचा हा नवरा. (प्रसाद वैतागतो.) नेहा एकच्युअली त्यालाच भेटायला आली होती दोन दिवसांपूर्वी. तुम्ही गेलात आणि थोड्याच वेळात हा आला. माझा मित्र आहे ना हा. लंडनला असतो तो. नुकताच आला तो लंडनहून विमानाने. सहार एअर पोर्टला उतरला. जवळ आहे ना आपल्याकडून सहार एअरपोर्ट. मग ती आली भेटायला इथे त्याला. आता जातील दोघे.. नंतर

त्यांच्या घरी. ते काय तिच्या गळयात मंगळसूत्र पण आहे त्याच्या नावाचं.

कमळी : मग त्या दिवशी का नव्हतं मंगळसूत्र?

समाधान : होतं ना. त्या दिवशी पण होतं. तुम्ही पाहिलं नसेल बरोबर.

कमळी : बाईच्या नजरेतून काही पण सुटेल हो साहेब. पण कपडे आणि दागिने कधीच सुटणार नाहीत बाईच्या नजरेतून. नेहाबाई, इकडे या जरा. हे मंगळसूत्र...कधी बनवलंत? मी असंच मंगळसूत्र बाईसाहेबांच्या गळयात पाहिलं होतं. तेच तर नाही ना हे?

समाधान : ए... तेच मॉडेल पाहून सेम बनविलं होतं प्रसादने लग्नासाठी. त्याच्या. त्याच्या लग्नासाठी. कपडे पण प्रियासारखेच घेतले त्याने. अजून काय विचारायचं?

कमळी : (कपडे पाहत) हो का. पण वाटत नाही ह्या दोघांना बघून कि हे नवरा बायको आहेत. एकदम एकमेकांशी अनोळखीच वाटतात ना दोघे. नेहाबाई तुमच्या साहेबांना शेवग्याच्या शेंगा जास्त खायला घाला. म्हणजे मग एकटीला सोडणार नाहीत तुम्हाला. (हसते) चला येते मी. (प्रसादला) शेंगा दिल्या आहेत साहेब तुम्ही खाच आज शेंगा. मस्त फरक बघा मग. (म्हणून हसून ती निघून जाते.)

प्रसाद : सम्या, आता हे नवीन नाटक काय केलंस.

समाधान : यार, हि बाई भाजीवाली आहे. जर का हिने संपूर्ण कॉलोनीमध्ये सगळयांना उलट सुलट काही सांगितलं तर. म्हणून मी पटकन.. नेहा, प्रसादचा चहा थंड झालाय. गरम करून आणशील का?

प्रसाद : असू दे. मी थंड चहाच पितो. एक ग्लास पाणी मिळेल का? (ती पाणी आणायला जाते.)

समाधान : चहा पी. (प्रसाद चहा तोंडात घेताच थुंकतो.) हा चहा आहे...? सम्या, एडझ.. (शिवी देत असतो.)

समाधान : ए..

प्रसाद : प्रियासारखी सुगरण सोडून काय हि माती खायचं आलं रे तुझ्या टाळक्यात.. असा सगळा चहाच कपासकट फेकून मारावासा वाटतोय तुझ्या थोबाडावर. (ती पाणी घेऊन येते. तो पाणी पितो.)

नेहा : चहा सगळा नाही संपविलात. आवडला नाही का तुम्हाला?

समाधान : बघ ना. मी किती बोललो याला. संपव चहा. संपव चहा. पण नाही संपवला याने. तू सांगून बघ याला. (प्रसाद रागाने समाधानकडे पाहतो.)

प्रसाद : पाणी प्यायची इच्छा झाली होती. नंतर पिईन चहा. सम्या, मी निघतो आता.

समाधान : अरे पण चहा पिऊन गेला असतास तर बरं वाटलं असतं तिला.

प्रसाद : (रागाने) सम्या, मला खूप उशीर झालाय.

समाधान : याला काय अर्थ आहे का? चहा बनव. चहा बनव. म्हणून ओरडत आलास आणि चहा न पिता चाललास. मी रोज पितो इतका सुंदर चहा. तुही रोज ये प्यायला. आणि आता आलाच आहेस तर संपवून जा ना तेवढा चहा.

प्रसाद : तू सकाळी भेट मला. मला त्या रेल्वे स्टेशन, पोलिस स्टेशन आणि ब्लास्टच्या जखमींना ज्या ज्या ठिकाणी ठेवलंय ना त्या त्या सर्व ठिकाणी जायचंय. होप सो तू येशीलच सोबत. अकरा वाजता भेट डायरेक्ट सांताक्रूझ स्टेशनला. बाकी सगळं तिथे बोलू.

समाधान : हो. मी काय म्हणतो प्रसाद.

प्रसाद : काय?

समाधान : थोडं जेवून जातोस का? (प्रसाद चहाच्या कपकडे पाहतो.)

प्रसाद : नको. चहा पिऊन आत्मा तृप्त झाला माझा. तुम्ही दोघांनीच सुखाचे जेवा एकत्र बसून. (प्रसाद निघून जातो.)

समाधान : हा प्रसाद. माझा आणि प्रियाचा कॉलेज मित्र. तो लंडनला गेला होता नोकरीसाठी. आजच आला. म्हणून तुला बोललो होतो थोडे दिवस आपण दूर राहू. आधी इथले सगळे प्रॉब्लेम सोर्ट आऊट होऊ देत. पण तुला नुसती घाई लागली होती ना इथे राहण्याची.

नेहा : तुला माझा त्रास होत असेल तर मी जाऊ का निघून? तसं असेल तर स्पष्ट सांग. फिरवा फिरवी नकोय मला. मी तुझ्या आयुष्यात आले नव्हते. तूच माझ्या आयुष्यात आलास. स्वतःच्या बायकोचे रडगाणे गायलेस. माझा विश्वास संपादन केलास. मीही वेड्यासारखं प्रेम करायला लागले तुझ्यावर.. काय चूक आहे रे माझी? तू प्रियाला आधीच डिवोर्स दिला असतास तर आजचा हा दिवस आलाच नसता. पण तुला दोन्ही बाजूने मजा मारायची होती ना. म्हणून ना प्रियाला सोडत होतास आणि ना मला. तू आज रात्रभर काय तो विचार कर आणि मला उद्या तुझा निर्णय हवाय. जो काही तुझा निर्णय असेल.

(ती रागाने बेडरूममध्ये निघून जाते. तो उठून खिडकीजवळ जातो.. हळूहळू काळोख.)

## प्रवेश 4

(प्रकाश. सकाळची वेळ. तो टी शर्ट घालत येतो. शूज घालतो आणि बेडरूममधील बाथरूमच्या दरवाजाजवळ जातो. नेहा आंघोळीला गेलेली आहे.)

समाधान : नेहा, मी येतो. बाहेरून लॉक लावून जाईन आणि लवकरच येण्याचा प्रयत्न करेन. तुझी आंघोळ झाली कि चहा घे. मी बनवून ठेवलाय चहा. चल येतो मी.

(तो जाऊन दरवाजा उघडतो आणि समोरून प्रिया दरवाजातून घाई घाईने येवून सोफ्यावर बसते. तो धावत येऊन तिच्या बाजूला बसतो.)

समाधान : प्रिया तू..? तू जिवंत आहेस?

प्रिया : हो. का रे? तू माझ्या मरणाची वाट पाहत होतास का?

समाधान : नाही.. तसं नाही गं. पण मग तू इतके दिवस कुठे होतीस. आणि आज अचानक.. तू इकडे..

प्रिया: इकडे म्हणजे? अरे इकडे नाही येणार तर दुसरीकडे कुठे जाणार मी? माझंच घर आहे ना हे?

समाधान: हो. पण इतके दिवस तू कुठे होतीस? आणि आज तू अचानक? (त्याचे लक्ष सारखे बेडरूमकडे असते.)

समाधान:  (स्वतःशीच) आता मी काय करू मलाच कळत नाहीये. देवा प्लीज वाचव रे मला.

प्रिया :  अरे त्या दिवशी तिथे ब्लास्ट झाला आणि मी लांब फेकले गेले. कुणीतरी मला एका हॉस्पिटलमध्ये घेऊन गेलं. पण मी खूप सिरिअस होते रे. मग शुद्धीत आले तेव्हा म्हंटलं कि आता जाऊन पहावं कि माझ्या आठवणीत तुझी काय अवस्था झालेय ते. तुला डोळे भरून पाहावंसं वाटत होतं एकदाचं.

समाधान :  हो एकदाच पाहशील आता मला डोळे भरून कारण त्यानंतर..

प्रिया :  त्यानंतर काय..?

समाधान :  नाही. काही नाही. तू बोल.

प्रिया :  का रे. मी आली ते पाहून तू खुश नाही वाटत मला.

समाधान :  अरे आहे ना मी खुश हे बघ माझ्या चेहऱ्यावर किती ख़ुशी दिसतेय ते.

प्रिया :  काश. पाहू शकले असते रे.. तेच पहायची खूप इच्छा होती पण..

समाधान :  पण काय?

प्रिया :  (गॉगल काढीत) त्या स्फोटात डोळे गेले माझे.

समाधान :  (आनंदाने) काय..? (दुखाने) काय.. तुझे डोळे गेले.

प्रिया : हो. माझे डोळे गेले. जाऊ देत. पण तुला भेटायची इतकी घाई झाली होती ना मला. मला आधी सांग. कसा आहेस रे तू..

समाधान : मी? मी मस्त.

प्रिया : मी नव्हते आणि तू मस्त होतास?

समाधान : अगं तसं नाही. म्हणजे आता तू आलीस ना आता मी मस्त. देवा.. (प्रिया बेडरूममध्ये जात असते.) ए, कुठे चाललीस?

प्रिया : कुठे म्हणजे. अरे बेडरूम मध्ये चाललेय आपल्या.

समाधान : ए. नको. बेडरूममध्ये काय बेडरूममध्ये. म्हणजे तू इथेच बस. मी तुला आधी पाणी देतो. तू पाणी पी. मी बेड व्यवस्थित लावतो आणि मग तुला नेतो. (तो किचनच्या दिशेने जात असतो. पुन्हा मागे वळून संशयाने तिच्याजवळ येतो.) पण तू इतकी सहज बाहेरून येऊन सोफ्यावर आरामात बसलीस? डोळे नाहीत मग हे कसं काय?

प्रिया : सम्या, माझे डोळे गेले आहेत. बुद्धी नाही. आपल्या घराचा कोपरा न कोपरा पाठ आहे मला. डोळे गेले पण दुःख नाही मला. कारण तू आहेस ना माझी काळजी घ्यायला.

समाधान : हो. मी आहे ना तुझी काळजी घ्यायला. थांब तुला पाणी देतो. (तो तिला पाणी आणून देतो. इतक्यात नेहा बेडरूममधून बाहेर

येते. तो तिला पटकन पकडून आत नेताना धडपडतो. प्रिया पटकन त्याच्या जवळ जाते. ती नेहाला हात लावणार असते तेव्हा सम्या स्वतःचा हात मधे टाकतो. प्रिया सम्याचा हात पकडते. तिला पाहून नेहा घाबरते.) प्रिया, मी ठीक आहे. तुला दिसत नाही ना. तुझे डोळे गेले आहेत ना. तू धावपळ नको करूस. चल मी तुला बेडरूममध्ये नेतो. (तो तिला बेडरूममध्ये घेऊन जातो. नेहाला गप्प बसून राहा असे खुणावतो. प्रियाला बेडरूममध्ये नेऊन बेडवर बसवतो. आणि लगेच बाहेर येतो.) नेहा तू लगेच वरच्या डाव्या बाजूच्या गेस्टरूम मध्ये पळ. प्रिया अचानक परत आलेय.

नेहा : अरे पण आता माझं काय होणार?

समाधान : तुझं काय, माझं काय नंतर खेळू आपण. आधी वर गेस्टरूममध्ये जा. नशीब तिला काही दिसत नाहीये. नाहीतर आज आपली दोघांची पण वरात होती एकत्र.

नेहा : अरे पण मला सामान तर घेऊ दे थोडसं.

समाधान : तू जा ना बाई गेस्ट रूममध्ये नाहीतर. आता कसं सांगू बाळा तुला. मी आणतो सामान थोड्या वेळाने. ठीक आहे. तू जा पाहू. (ती जाते. तो बेडरूममध्ये जातो.)

प्रिया : सम्या, आलास का तू? कुठे होतास रे इतका वेळ..

समाधान : इथेच होतो. सेटिंग करीत होतो तिची.

प्रिया : तिची सेटिंग म्हणजे.. (समाधान डोक्यावर हात मारतो.)

समाधान : तिची म्हणजे. गादीची.

प्रिया : अरे पण गादी तर इथे आहे ना?

समाधान : तू शांत बस पाहू. एकतर तू आल्याचा इतका आनंद झालाय कि काय सांगू. मला काही कळतच नाही आहे कि काय करू आणि काय नको.

प्रिया : तू काहीहि करू नकोस. इथे माझ्याजवळ बस पाहू. (ती त्याचा हात हातात घेते. इतक्यात तिथे सावकाशपणे नेहा येते आणि दोघांचे हात हातात पाहून तिचा चेहरा लाल होतो. सम्या तिच्याकडे दीनवाणा लूक देतो.) माझी आठवण येत होती का रे..

समाधान : हो येत होती ना. (नेहा त्याला खुणावते आहे कि तू आधी बाहेर ये.) प्रिया तू आराम कर थोडा वेळ. मी आलोच.

प्रिया : नको, तू थांब ना थोडा वेळ इथेच. तू असलास कि मिळेल मला आराम. तुझ्या खांद्यावर डोकं ठेवून पडते थोडा वेळ. (नेहा रागाने जाऊन सोफ्यावर बसते.)

समाधान : मी जरा घर व्यवस्थित करून घेतो हा. तो पर्यंत तू आराम कर. तुला खायला काय बनवू ते सांग पाहू मला.

प्रिया : काहीही बनव. जे तू प्रेमाने बनवशील ते खाईन मी. तू विष जरी दिलंस तरी नाही म्हणणार नाही. देशील ना?

समाधान : हो देईन.

प्रिया : काय? तू विष देणार मला?

समाधान : विष. छे. कोण म्हणालं असं?

प्रिया : तूच तर आता म्हणालास.

समाधान : प्रिया, तू शांत पड ना जरा. मी आलोच थांब. (तो बडबडतच हॉलमध्ये निघतो.) इथे आता मलाच विष खायची वेळ आलेय. हिचे डोळे गेले आहेत आणि माझे कान, नाक सगळंच बंद होत आलंय.

नेहा: झाली का बायकोची सेवा करून. जा झोपव जा तिला. मला म्हणे. तू गेस्ट रूममध्ये जा म्हणजे हा बेडरूममध्ये मजा मारायला मोकळा.

समाधान : तू तोंड बंद कर ना बाई. तिने ऐकलं तर मग खूप प्रॉब्लेम होईल. तू इथे नको गं बसू. जा ना गेस्ट रूममध्ये. आणि लवकरात लवकर तू ह्या घरातून पळ.

नेहा : मी कुठेही जाणार नाही. समजलं ना. तिचं काय करायचं ते तू बघ पण मी नाही जाणार कुठेच. मी इथेच राहणार.

समाधान : अगं ती आंधळी झालेय. बहिरी नाही झालेय. तू इतकी बडबड केलीस तर ऐकायला जाईल ना तिला.

नेहा : ऐकायला गेलं तर गेलं. मला नाही फरक पडत.

समाधान : अगं तुला कसला.. जो काय फरक पडणार आहे ना तो मलाच पडणार आहे. आता फरका फरकानेच मला पडणार आहे. देवा वाचव रे. नेहा तू कशाला आलीस गं इथे राहायला?

नेहा : (रागाने त्याच्याकडे पाहत) पुन्हा सुरु झालं तुझं..? ठीक आहे बोल. काहीही बोल. पण मी आता इथून जाणार नाही म्हणजे नाही.

प्रिया : (बाहेर येत) कोण कुठे जाणार नाहीये रे..

समाधान : ए.. तू बाहेर का आलीस..?

प्रिया : अरे मला असं वाटलं कि तू कुणाशी तरी बोलतो आहेस. म्हणून बघायला आले.

समाधान : बघायला.. पण तुला तर दिसत नाही ना?

प्रिया : अरे मुर्खासारखे पी जे मारू नकोस. बघायला म्हणजे बघायला.. ऐकायला. कि कोण आलंय आपल्याकडे. इतके दिवस मी नव्हते तर किती जण माझी चौकशी करायला आले असतील ना? पण खरं सांगू सम्या.

समाधान : अजून काय खरं बाकी आहे?

प्रिया : खूप खूप बाकी आहे. पण आधी सांग इथे आवाज कुणाचा येत होता?

समाधान : तो. तो.. टीव्हीचा आवाज होता.

प्रिया : अरे पण कुणी मुलगी बोलत होती कि मी इथून जाणार नाही म्हणजे नाही.

समाधान : ते. ते. ते सिरिअलचे संवाद होते. संवाद. डायलॉग. सिरिअलचे डायलॉग.

प्रिया : पण असला कसला डायलॉग..

समाधान : अगं असंच असतं आजकाल. एखादा डायलॉग एका सिरिअलमध्ये आला ना कि तो दुसऱ्या चॅनलच्या दुसऱ्या सिरिअलमध्ये दिसणारच तुला.. आपल्या सिरिअल कधी पुढे जातच नाहीत. बायको मी इथून जाणार बोलली ना.. तरी तू बघ. शंभर एपिसोड झाले तरी ती हेच बोलत असेल कि मी इथून जाणार. पण जाणार

मात्र नाही ती. असला राग येतो ना ह्या सिरिअल बघताना आणि कुणी जाणार नाही बोलली ना (नेहाकडे पाहत) कि असली कानपटाविशी वाटते ना तिला..

नेहा : हात तर लावून बघ.

प्रिया : आता हे कोण बोललं?

समाधान : टीव्ही, टीव्हीवर सिरिअल सुरु आहे ना. (बायकी आवाजात) में मेरी झासी नही दूंगी.

प्रिया : अचानक हिंदी सीरिअल?

समाधान : फाशीच घ्यावी लागणार बहुतेक मला.

प्रिया : शी,किती वाईट डायलॉग रे हे? एकदा हिंदी,एकदा मराठी,झासी काय. फासी काय?

समाधान : चॅनल चेंज केलं होतं ना?

प्रिया : मग एकच काय ते लाव ना चॅनल. एका वेळी दोन दोन काय?

समाधान : तीच माती खाल्ली ना आयुष्यात.

प्रिया : बरं, काय चाललंय सीरिअलमध्ये?

समाधान : आता दोन बायकांमध्ये नवऱ्याचा सॅंडविच झालाय.

प्रिया : काय..

समाधान : अगं त्या सिरियलमध्ये. दोन बायकांचे एका नवऱ्यासाठी भांडण सुरु आहे. आणि तो साकटलाय दोघींच्यामध्ये.

प्रिया : मग एक घरात असताना बाहेर माती खायला जायची गरजच काय त्या नवऱ्याला?

समाधान : (नेहाकडे पाहत.) केव्हा केव्हा सुचते अवदसा पुरुषांना. आणि मग भोगतात आपल्या कर्माची फळं.

प्रिया : असल्या नालायकांना झाडूनेच चोप द्यायला पाहिजे.

समाधान : (आवंढा गिळत) प्रिया, तू आराम कर ना गं थोडा वेळ. फक्त दहा मिनिटातच तू फेस आणलास माझ्या तोंडाला.

(इतक्यात वैतागलेला प्रसाद येतो.)

प्रसाद : आणि तिथे त्या रेल्वे स्टेशनला बसून बसून माझ्या तोंडाला फेस आला त्याचं काय? किती वाजता तू येणार होतास आणि वाजले किती? (प्रसादचे लक्ष प्रियाकडे जाते.. प्रिया.. (तो समोर उभ्या असलेल्या नेहाकडे पाहतो.) नेहा..

प्रिया : नेहा..? कोण नेहा?

समाधान : नेहा.. अगं तो म्हणाला प्रियाला आराम करायला नेहा.

प्रिया : अरे पण कोण म्हणाला?

समाधान : तुला दिसत नाही का? आयला हिला खरंच दिसत नाही. थॅन्क्स देवा.

प्रिया : काय?

समाधान : अगं प्रिया. आपला प्रसाद आलाय.

प्रसाद : ए. प्रसाद आलाय काय? तिला दिसत नाही का मी?

समाधान : नाही ना दिसत तिला. अरे तिला दिसलं असतं तर तुला मी इथे दिसलो असतो का? (दुखी स्टाइलमध्ये) त्या स्फोटात. त्या स्फोटात डोळे गेले तिचे. आता तू अजून काही गडबड करू नकोस. तिला थोडा आराम करू दे.

प्रिया : सम्या तू गप रे. प्रसाद तू कधी आलास? लंडनला गेला होतास ना तू. परत आलास लंडनहून.

समाधान : तू इतक्या लांबून परत येऊ शकतेस तर तो तर लंडनहूनच परत आलाय. मी थकलोय रे पळापळ करून आपण आरामात बसून बोलूया का थोडा वेळ? (नेहा बसते. तो वैतागतो.) हिच्या तर ना.. तुला बसायला सांगितलंय का मी? जा. वर पळ तू.

प्रिया : अरे कुणाला पळायला सांगतो आहेस?

समाधान : मी.. कुणाला.. हा ती शेजारच्या बाबारावांची मांजर आली आहे.. (मांजरीचा आवाज काढतो.) हट. हट.. तिकडे जा.. ( तो नेहाला हाकलू लागतो. नेहा सोफ्यावरून उठून खिडकीजवळ जाते.)

प्रसाद : (सम्याला)झालं तुझं सगळं? प्रिया कुठे होतीस तू? काय झालं ते मला सविस्तर सांग.

प्रिया : अरे काही नाही रे. त्या दिवशी ना मी सांताक्रूझ स्टेशनला ह्याची वाट पहात होते. हा मुर्ख मला विचारतो कि साड्यांचा सेल लागलाय तिथे जाशील आणि खरंच रे बाजूला मोठा होर्डिंग होता साड्यांच्या सेलचा ह्याच्याशी बोलता बोलता मी होर्डिंग वाचायला गेले आणि स्फोट झाला. मी एकीकडे उडाले आणि माझा फोन दुसरीकडे उडाला. आणि मी जिथे उडाले ना तिथे माझी एक ट्रेनची मैत्रीण होती. नर्स आहे ती. ती मला घेऊन तिच्या हॉस्पिटलमध्ये गेली. काही दिवस बेशुद्धच होते ना मी. आणि तिला मी कुठे राहते, कुठे कामाला आहे त्याची परफेक्ट माहिती नव्हती ना. म्हणजे घराचा. ऑफिसचा अड्रेस वगैरे. पण तिने खूप काळजी घेतली माझी. माझं पर्स, मोबाइल सगळं गायब होतं ना. त्यात मी बेशुद्ध मग कसं काय कळणार तिला आपला पत्ता. मग जेव्हा मी बरी झाले तेव्हा मला कळालं कि मी आंधळी झालेली आहे. पण जिवंत तर आहे ते पाहून तिला बरं वाटलं. ती म्हणाली सहा महिन्यानंतर एक ऑप्रेशन करू. डोळे चांगले

व्हायचे चान्सेस आहेत. मग मी बरी झाले आणि आले इकडे माझ्या सम्याला भेटायला.

समाधान : मग ती तुझी मैत्रीण का घेवून नाही आली तुला. तू एकटीच कशी आलीस?

प्रिया : ह्याला ना माझ्यापेक्षा जास्त माझ्या मैत्रिणींमध्येच इंटरेस्ट असतो नेहमी. अरे मुर्खा. मला तुला सरप्राइज द्यायचं होतं ना. कसं वाटलं सरप्राइज? (इतक्यात कमळी येते.)

कमळी : बाईसाहेब. कश्या आहात तुम्ही? मला आता खाली प्रधान बाईसाहेब बोलल्या कि तुम्ही आला आहात. त्यांनी तुम्हाला बिल्डींगमध्ये घुसताना पाहिलं. कसली धावत आलेय मी. लिफ्ट चालू होती पण काही सुचलंच नाही बघा. तशीच धावत आले मी. कधी आलात तुम्ही?

समाधान : आताच आल्या आहेत त्या. कमळीबाई तुम्ही या. आता तिला थोडा वेळ आराम करू देत हा.

प्रिया : सम्या, तू ओळखतोस कमळीला?

समाधान : हो. (दात ओठ खात) तू नव्हतीस तेव्हा भाजी द्यायला आल्या होत्या कमळीबाई.

कमळी : नुसती भाजी नाही काही. (नेहाला उद्देशून) तुमचं हे पार्सल पण मीच इथे पोहोचवून गेले.

समाधान : (राग कंट्रोल करीत) कमळीबाई तुम्ही या आता. बाईसाहेबांना थोडा आराम करू देत. थकल्या आहेत त्या.

प्रिया : सम्या, असू दे रे. इतकी काही थकली नाही मी. आणि प्रसाद सुद्धा आलाय ना त्याच्याशी बोलू दे मला. किती दिवसांनी भेटलाय तो. त्याची काही विचारपूस पण नाही केली मी. त्याला चहा पण नाही विचारला.

कमळी : मी बनवून देवू का चहा. थांबा तुमच्या चौघांसाठी चार कप ठेवते.

समाधान : हिच्यातर ना आता. ओ कमळी बाई.. तुमच्या भाजीच्या धंद्यावर कुणी नसेल ओ. जा लवकर तिकडे.

कमळी : माझा नवरा आहे तिकडे. आणि चांगला विश्वास आहे माझा माझ्या नवऱ्यावर. इकडे तिकडे वास काढणारा नाहीये तो बाकीच्या नवऱ्यांसारखा.

समाधान : डोक्यातच चाललेय रे हि.

कमळी : बाई बोला कोणती कोणती भाजी आणू बोला..? मोठं वांग आणू का तुमच्या चौघांसाठी ? एका वांग्याच्या भरत्या मधेच चौघे पण खाल.

समाधान : अगदी मोठं वांगं आणा. तुमच्या साईजचं. कुणी नाही खाल्लं तर मी एकटा खाईन. (ती रागाने पाहते.) तुम्हाला जे जे वाटेल ते ते आणा. पण आता इथून जा. मला जरा बोलूद्या हो माझ्या बायकोशी.

कमळी : हो हो. येते मी. (प्रियाला) येते बाई साहेब. (समाधानला) ओ बाई साहेबांचे साहेब येते मी.

समाधान : हो या.

कमळी : (प्रसादला) ओ तुम्ही साहेब येते मी. (नेहाला) आणि साहेबांच्या बाईसाहेब चला येते मी. काही चुकीचं बोलले असेन तर माफ करा हा मला.

प्रिया : नाही गं वेडे. तू कुठे काय चुकीचं बोललीस मला.

कमळी : तुम्हाला नाही हो या दुसऱ्या बाईसाहेबांना. आय माय सॉरी बरं का.

प्रिया : दुसरी बाई..? कोण दुसरी बाई.

कमळी : कोण म्हणजे. तुम्हाला दिसत नाही का हि दुसरी साडे पाच फुट उभी बाई.

प्रिया : साडे पाच फुट उभी बाई? कुठे आहे?

कमळी : (तिच्या जवळ जात) तब्बेत बरी आहे ना तुमची?

समाधान : कमळी बाई तुम्ही जा ना हो आता. (स्वताशीच) हि बाई आज मला पक्का पोचवूनच जाणार.

प्रिया : कमळी, मला खरंच दिसत नाही गं. स्फोटात माझे डोळे गेले.

कमळी : काय..? म्हणजे तुम्ही आंधळया झालात?

प्रिया : हो.

कमळी : तुम्हाला खरंच दिसत नाहिए?

प्रिया : हो. खरंच दिसत नाहिए?

कमळी : म्हणूनच तुमच्या मागे हि आंधळी कोशिंबीर चालली आहे काय. पण माझं नाव पण कमळी आहे कमळी. आधी मला सांगा कसला स्फोट झाला होता. आणि त्याच्या आयला कुठल्या हरामखोराने घडवला होता तो स्फोट. छाटूनच टाकते त्याला.

समाधान : (कमळीला) ए., कमळीबाई, तुम्ही माझ्याकडे अश्या काय बघताय? हट, मला लायटर पेटवता येत नाही तर. स्फोट म्हणजे.

प्रिया : कमळी, अगं सांताक्रूझला बॉम्ब ब्लास्ट झाला ना त्यात डोळे गेले माझे.

कमळी : पण माझे डोळे शाबूद आहेत अजून. तुम्ही घाबरू नका. जर तुम्हाला कोणी टच पण केला ना तर आई शपथ छाटूनच टाकते बघा त्याला.

प्रिया : कमळी, अगं मला कोण त्रास देणार माझ्याच घरी. इथं असतं कोण. मी, सम्या आणि आता प्रसाद आलाय बस. तिघेच तर आहोत.

कमळी : अरे मघापासून बोम्बलतेय मी कि हि चौथी. हि चौथी. कानपुर लाईन पण बंद झाली काय तुमची? ऐकायला पण येत नाही काय तुम्हाला? थांबा मी सुराच घेऊन येते माझा आणि नारळासारखा सोलूनच काढते एका एकाला.

प्रिया : समाधान कोण आहे इथं? खरं सांग मला. प्रसाद काय रे?

प्रसाद : ते प्रिया..

समाधान : अगं प्रिया हि नेहा. प्रसादची बायको. तुला सरप्राइज द्यायचं ठरवलं होतं त्याने पण कमळी.. कमळीबाईंनी सगळा गोंधळ घातला ना. सगळ्या सरप्राइजची मजा गेली.

प्रिया : पण ती कधी आली?

समाधान : आताच प्रसाद बरोबर.

प्रिया : मग प्रसाद बोलला नाही ते?

समाधान : तेच तर सरप्राइज होतं ना.

प्रिया : अरे पण प्रसादला कुठे माहित होतं कि मी आलेय इथे आणि त्याचं मला सरप्राइज द्यायचं कधी ठरलं ?

कमळी : बाई, हे माझं कार्ड ठेवा तुम्ही. मी आमच्या महिला मंडळाची प्रेसिडेंट आहे. जर काही दगा वाटला तर लावा फोन. अहो पण तुम्ही कसा काय फोन लावणार? तुमची तर हेड लाईटच उडालेय ना? एक काम करा. तुम्ही फक्त आरडा ओरडा करा मी सगळयांना सांगून ठेवते. कि तुमच्या घरी आरडा ओरडा झाला रे झाला कि करा मला फोन. मग कुनाचाबी फोन आला रे आला कि मी सुरा घेऊन इथे आलेच म्हणून समजा.

समाधान : कमळीबाई. का हो माझ्या सुखाच्या संसाराला सुरा लावताय तुम्ही? तुम्हाला मी आधीच सांगितलं होतं ना कि हि ह्याची बायको आहे म्हणून.

प्रिया : आधीच म्हणजे?

समाधान : अगं म्हणजे प्रसाद आणि हि दोन दिवसांपूर्वीच आले ना. तू नव्हतीस आणि मी एकटाच पडलो होतो तुझ्या आठवणीत. टेन्शनमध्ये. म्हणून थांबले दोघेही माझ्यासाठी. किती काळजी वाटत होती मला तुझी. (प्रियाचं डोकं दुखू लागतं ती डोक्याला

हात लावून खाली सोफ्यावर बसते.) प्रिया तुला आरामाची गरज आहे. नेहा तू प्रियाला बेडरूममध्ये नेहा. मी कमळीबाईना दरवाजापर्यंत सोडून येतो. चला कमळीबाई. एक सांगू कमळीबाई.. तुमच्यावर खूप अभिमान वाटतो आहे मला. माझ्या बायकोवरचं तुमचं प्रेम पाहून खूप बरं वाटलं मला. आजकाल बाजूला कुणाला कापून टाकलं तरी बाजूचा ढुंकून पाहत नाही पण आज खरंच समाजाला तुमच्यासारख्या कर्तबगार स्त्रियांची गरज आहे. (दरवाजा जवळ येताच) दरवाजा आला.. या आता आपण पुन्हा भेटू. बाय. (दरवाजा लावून घेतो. नेहा प्रियाला बेडरूममध्ये घेऊन गेलेली असते. समाधान प्रसाद जवळ जाताच पुन्हा दरवाजाची बेल वाजते. समाधान दरवाजा उघडतो. कमळी पुन्हा येते.)

कमळी : पण तुम्ही म्हणाला होतात कि बाई माहेरी गेलेल्या आहेत. खोटं का बोललात हो?

समाधान : माझे आई.. मग मी काय नगारा वाजवीत फिरू का कि माझी तरुण बायको गायब आहे म्हणून.. कळत कसं नाही गं तुला.. आय मिन कळत कसं नाही हो तुम्हांला. तुम्ही भाजीवाली आहात. डिटेक्टिव्ह बनून का बिच्याऱ्यांच्या पोटावर पाय देताय तुम्ही. नाहीतरी ऑलरेडी त्यांचे दिवस खराब आहेत आधीच. त्यात कमळीबाई तुम्ही सुद्धा..? मला वाटतं तुमच्या सर्व प्रश्नांची उत्तरं

तुम्हाला मिळाली असतील. आता जा तुम्ही आणि हो पुन्हा इकडे येऊ नका मी न चुकता रोज संध्याकाळी भाजी घ्यायला येईन तुमच्याकडे आणि माझ्या घरून कसलाच आरडा ओरडा तुमच्या कानापर्यंत नाही पोहोचणार. तुमच्या महिला मंडळाला माझा नमस्कार सांगा. जय हिंद. जय महाराष्ट्र. या आता. (म्हणत तो तिला बाहेर काढून दरवाजा बंद करतो. आणि हॉलमध्ये येऊन बसतो.)

प्रसाद : सम्या, काय चालवलं आहेस तू? तू नेहाला माझी बायको बनवून टाकलंस. साल्या तुझा ना थोबडा फोडून टाकावासा वाटतो आहे मला. लफडी तू कर आणि नंतर माझ्या गळयात टाक. थांब मी प्रियाला सगळं खरं खरं सांगून टाकतो.

समाधान : ए खरं खरं सांगून टाकतो काय? तिला कळालं ना कि नेहा आणि माझं लफडं तर सलाड सारखा कापून टाकेल ती मला. तुला माहितेय ना ती डीटेक्टीव्हची पण बाप आहे. कधी कोणाकडून काय काढून घेईल ना पटकन ते त्याला पण कळणार नाही. हि नेहा कुठे गेली?

प्रसाद : तूच बोललास ना तिला, “ नेहा तू प्रियाला बेडरूममध्ये नेहा. ”

समाधान : आयचा घो. अरे ती नेहा एक नंबरची एड....

प्रसाद : ए..

समाधान : येडपट आहे रे. प्रिया तिला पोपटासारखं बोलायला लावेल आणि हि नेहा बकाबक ओकेल माझी सगळी लफडी.

प्रसाद : चल बाय बाय.. मी जातो.

समाधान : जातो काय जातो. लाज वाटते का तुला मला असा लफड्यामध्ये एकट्याला सोडून जायला.

प्रसाद : तुला लाज वाटली का अशी लफडी करायला? नाही ना. मग केलेयस तर भोग मग. तुला साल्या मस्त पडली पाहिजे. दोन लाफे मारायला मी पण येईन.

समाधान : तू मित्राला असा अधांतरी सोडून जाणार?

प्रसाद : डायलॉग नको मारूस जास्त. दमशील. आधी आत जा नाहीतर मग डायलॉग मारायला हवा पण नाही येणार तुझ्या तोंडातून. (समाधान बेडरूममध्ये जातो. हळूच अंदाज घेतो कि दोघांची काय बोलणी चाललेली आहेत. दरवाजावर धडपडतो.)

प्रिया : सम्या, इकडे ये.

समाधान : आयला तुला कसं कळालं मी इथे आलोय ते?

प्रिया : सम्या, मी आंधळी झालेय, बहिरी नाही. आणि आपल्या घरी तुझ्याशिवाय दुसरा कुणी धडपड्या आहे का? त्यात तू माझा

फेवरेट परफ्युम मारला आहेस. इकडे ये. तुझी सगळी लफडी कळाली मला.

समाधान : (स्वतःशीच) आईच्या गावात. आता मी बाराच्या भावात. हीच ओकली असेल एडझ..

प्रिया : इकडे बस ये माझ्या शेजारी. (तो घाबरत रागाने तिच्याकडे पाहत हळूहळू जाऊन प्रियाच्या शेजारी बसतो.)

प्रिया : सम्या, काय चाललं आहे तुझं आजकाल?

समाधान : माझं. कुठे काय चाललं आहे माझं. काहीच नाही.

प्रिया: नेहाने सांगितलं सगळं मला. (तो रागाने नेहाकडे पाहतो. ती मान खाली घालते.) माझ्या बरोबर घेतलेल्या शपथा शेवटी तोडल्यास ना तू. कुठे कमी पडले रे मी?

समाधान : आय एम सॉरी प्रिया? मला माहितेय माझ्याकडून चुकी झाली. पण..

प्रिया : पण मला नाही आवडलं हे. मी नव्हते तर तू.. (तो मान खाली घालतो.) तू.. रोज दारू पीत होतास?

समाधान : दारू? म्हणजे नेहाने तुला माझ्या दारूबद्दल सांगितलं?

प्रिया : हो.

समाधान : फक्त दारूबद्दल?

प्रिया : हो.

समाधान : बाकी काहीच नाही सांगितलं? (तो नेहाला फ़्लाइंग किस देतो.)

प्रिया : अजून काय सांगायचं बाकी होतं?

समाधान : अगं काहीच नाही. गम्मत करीत होतो मी.

प्रिया : पण मी गम्मत करीत नाहीये. तू शपथ घेतली होतीस माझ्यासमोर कि तू दारूला स्पर्श करणार नाहीस म्हणून आणि मी जेव्हा नेहाला विचारलं कि तू कोणा कोणाला दारू पिताना पाहिलंस तर आधी ती टाळत होती पण नंतर तिला तिच्या नवऱ्याची शपथ दिल्यावर सांगितलं तिने कि तुलाच एकट्याला पिताना पाहिलं तिने. पाहिलंस किती प्रेम आहे तिचं तिच्या नवऱ्यावर ते. नाहीतर तू.. माझी शपथ घेऊन पण प्यायलास ना शेवटी. किती कमनशिबी आहे मी. आणि किती नशीबवान आहे हिचा नवरा. कुठे आहे कुठे प्रसाद? (ती उठून बाहेर निघते. आणि झपझप पावलं टाकीत हॉलमध्ये जाते. प्रसाद तिच्याकडे पाहताच राहतो.)

प्रसाद : प्रिया, तुला दिसायला लागलं? (ती सोफ्यावर जाऊन बसते. तो तिच्या बाजूला जाऊन बसतो.) I am sorry प्रिया. माझी काहीच

चूक नाहीये यात. सगळी लफडी... (समाधान धावत येतो आणि त्याचं तोंड हाताने बंद करतो.)

समाधान : प्रिया, प्रसादचा काहीच दोष नाही. प्रसाद नाही प्यायला दारू. त्याने पण सांगितलं होतं मला कि नको पिवूस. नको पिवूस. पण मी प्यायलो. मला तुझी खूप खूप आठवण येत होती ना. म्हणून खूप खूप प्यायलो गं मी. (डोळा मारून प्रसादला खुणावतो.)

प्रिया : प्रसाद, तुला एक सांगू का? मला तुझी चोईस आवडली. नेहा छान मुलगी आहे. खूपच इनोसंट आहे ती. (नेहा प्रियाकडे पाहू लागते.)

प्रसाद : प्रिया, मला तुला काहीतरी सांगायचं आहे.

प्रिया : आता काही सांगू नकोस. मी आत जाऊन थोडा वेळ आराम करते.

प्रसाद : अगं प्रिया. (प्रिया बेडरूममध्ये जाते. इतक्यात बेल वाजते.)

समाधान : आता अजून कोण आलं. साला एकातून नाही सुटलो तर, दुसरं काहीतरी समोर. किती खोटं बोलू.. ती कमळी आली असेल ना आता. तर. तिच्या तर ना..

(समाधान जाऊन दरवाजा उघडतो. नेहाचा बाप रिटायर्ड कर्नल रावसाहेब वाघमारे आत येतो..)

समाधान : कोण हवंय?

रावसाहेब : मी रावसाहेब वाघमारे. नेहाचा बाप... (समाधान खूप घाबरतो. नेहा वडिलांना पाहून लगेच बाजूच्या कपाटाला चिकटून लपते. समाधानच्या तोंडून शब्द फुटत नाहीत.)

## मध्यांतर

# अंक दुसरा

(समाधान घामाघूम आहे. तो खुणेनेच त्यांना विचारतो कि काय काम आहे?)

रावसाहेब : काय.. (समाधान पुन्हा खुणेनेच त्यांना विचारतो कि काय काम आहे? असे दोनचार वेळा होते.) काय काम आहे?

समाधान : हो (आवंढा गिळतो.)

रावसाहेब : मी नेहाचा बाप. रावसाहेब वाघमारे. रिटायर्ड कर्नल. इथे सम्या कोण आहे? (समाधान खूप घाबरतो. सम्या प्रसादकडे पाहतो. प्रसाद त्याच्याकडे रागाने पाहतो. रावसाहेब प्रसादकडे वळतो. नेहा लपलेली आहे.)

प्रसाद : नमस्कार, मी प्रसाद पराडकर. दोन दिवसांपूर्वीच लंडनहून आलोय. आणि हे माझं घर नाहीये. मी तिकडे लंडनलाच असतो.

समाधान : तुझ्या.. (प्रसादला ओरडतो. रावसाहेबने पाहिल्यावर त्यांना स्माईल देत) तुमचं काय काम होतं सम्याकडे? ( समाधान त्यांच्यासोबत बोलताना नेहाला बेडरूममध्ये पाठव असे तो प्रसादला खुणावतो.)

रावसाहेब : काय काम होतं ते मी त्यांनाच सांगेन. तुम्ही कोण?

समाधान : मी म्हणजे तो. तो म्हणजे मी. (प्रसादला) अरे ने ना पटकन. (नेहा आत जाते. समाधान थोडा रिलॅक्स होतो.)

समाधान : आता बोला.

रावसाहेब : तुम्हाला घाम का फुटलाय?

समाधान : घाम फुटलाय मला? काय बोलता. (रुमालाने तोंड पुसतो.) आयला हो. खरंच घाम फुटलाय मला. गर्मी आहे ना खूप. ते काय पृथ्वीभोवती ओझोनचा थर कमी झालाय ना. मग सूर्याची किरणं फिल्टर होऊन नाही येत बरोबर. म्हणून आजकाल गर्मी वाढत चाललेय. म्हणून येतो घाम.

रावसाहेब : मला काहीतरी डाऊट येतोय?

समाधान : कसला डाऊट? तुम्ही असं संशयाने काय बघताय माझ्याकडे?

रावसाहेब : मला नेहाच्या मैत्रिणीकडून कळालंय कि या कॉलोनीमध्ये कोण सम्या नावाचा मुलगा आहे त्याच्याकडे नेहा गेलेय.

समाधान : (हे ऐकून तो घाबरतो. पण स्वतःला सावरीत) असा गैरसमज होतो बघा. आमची कॉलोनी खूप मोठी आहे. हवं तर तुम्ही पुन्हा एकदा हि कॉलोनी फिरून या. बघा कुणीतरी सम्या भेटेल.

रावसाहेब : मी ऑलरेडी तुमच्या कॉलोनीमध्ये चौकशी करून आलोय. एक सम्या भेटला सुद्धा.

समाधान : बघा, मी बोललो होतो ना तुम्हाला. चला आपण पुन्हा त्याला भेटू. प्रसाद, आम्ही आलोच हा. (नेहाबद्दल खुणावत) तू इथलं सामान नीट बाहेर नेहा.

रावसाहेब : मी ऑलरेडी त्या सम्याला भेटून आलोय.

समाधान : मग विचारलं का त्याला नेहाबदल?

रावसाहेब : तो फक्त दहा वर्षांचा शेम्बडा पोरगा आहे. इतकी पण घाणेरडी चॉईस नसेल हो माझ्या पोरीची. थोडी स्लो आहे पण इतकी पण नाही.

समाधान : काय इतकी पण नाही. म्हणे थोडी स्लो आहे. ढील आहे ढील.

रावसाहेब : तुम्हाला कसं माहीत कि ती ढील आहे?

समाधान : (टेन्स) ते म्हणजे. काय रे प्रसाद? (प्रसाद त्याला टाळून खिडकीतून बाहेर पाहू लागतो.) हा म्हणजे काय. इतकी समजदार मुलगी, इतक्या हँडसम बापाला असं वणवण भटकायला सोडून जाईल का कधी? बोला. (वैतागतो.)समजदार असती तर गेली असती का? बोला ना आता. बोला.

रावसाहेब : (सेंटी होत) होय हो. मी तिचं लग्न ठरवलं होतं आणि ती मलाच सोडून पळून गेली. तुम्हाला सांगतो, तिच्या लहानपणीच तिची आई गेली.

समाधान : कुठे?

रावसाहेब : तिकडे. दूर. लांब.

समाधान : म्हणजे तिची आई पण पळून गेली होती?

रावसाहेब : नाही हो. ती देवाघरी गेली. आम्हा दोघांना सोडून. पोरीला आईच्या मायेने आणि बापाच्या धाकाने वाढवलं. पण आज एकटा पडलो हो मी. कुठे आहेस गं नेहा. नेहा.

नेहा : (आतून) काय बाबा? (प्रसाद कपाळावर हात मारतो.)

रावसाहेब : नेहाचा आवाज आला. कुठून आला? (सगळीकडे शोधू लागतो. समाधान त्याच्या मागून पळतोय.) हा. आतून आला. (तो बेडरूम जवळ धावत जातो.) खोला. हा बेडरूम खोला.

समाधान : (समाधान दोन्ही हात पसरून बेडरूमच्या दरवाज्यासमोर उभा राहतो.) खोला खोला काय? दुसऱ्याच्या बेडरूमच्या जास्त खोलात जाऊ नका. चला तिकडे. हॉलमध्ये सोफ्यावर बसून बोलूया.

रावसाहेब : अहो पण मला बेडरूमच्या आतूनच नेहाचा आवाज आला.

समाधान : हे बघा. या बेडरूमच्या आतून नाही काही. तुमच्या आतून आला आवाज. काय रे प्रसाद?

प्रसाद : असेल. तुम्ही दोघे काय ते ठरवा. मला नका घेऊ मधे.

रावसाहेब : नाही हो. मी ऐकलं ना. नेहाचाच आवाज होता.

समाधान : आत माझी बायको प्रिया झोपलेय. आणि ती बानो नाही म्हाळसा आहे. जर का तिने दुर्गा रूप घेतलं ना.. तर मग..

रावसाहेब : अहो पण तिचा आवाज.

समाधान : ह्यांच्या कानाखाली आवाज काढू काय रे? अहो तुम्ही सतत तिचाच विचार करताय ना म्हणून तुम्हाला तसा भास झाला असेल.

रावसाहेब : असेलही.

समाधान : असेलही नाही. झालाच आहे. निघा आता. म्हणजे या तुम्ही. आणि काही टेन्शन घेऊ नका. येईल तुमची मुलगी घरी.

रावसाहेब : कसली येतेय. लग्न करून गेली ती. मला पत्र लिहून गेली. तुम्हाला सांगतो. माझ्या पोरीला फसविणारा हातात सापडलाना तर त्याची मानच तोडून टाकणार. त्याचा हातच तोडून टाकणार. त्याचा पायच तोडून टाकणार. त्याचा...(प्रसाद हसत समाधानला चिडवतोय. समाधान वैतागतो.)

समाधान : बस करा हो. काहीतरी ठेवा त्याच्या शरीरावर. इतका पण वाईट नाहीये तो.

रावसाहेब : तुम्हाला कसं माहीत? म्हणजे तुम्ही त्याला ओळखता..

समाधान : छे, मी कसा काय ओळखेन. असंच आपलं अंदाज बांधला. तुम्ही जा घरी. काय माझ्या बायकोला बरं नाहीये ना. तुमच्या सम्या सम्या बोलण्याने तिला वाटेल कि मीच... नेहाला पळवलंय कि काय.

रावसाहेब : मला माफ करा. काय. माझी मुलगी आहे हो ती. थोडीशी चंचल. थोडीशी धांदरट आहे.

समाधान : थोडीशी?

रावसाहेब : थोडी जास्त धांदरट असेल पण मनाची खूप चांगली आहे हो.

समाधान : हे मात्र खरंय. मनाची खूप चांगली आहे ती. (प्रसाद कपाळावर हात मारतो. रावसाहेब जाता जाता दरवाज्यातून रिटर्न येतो.)

रावसाहेब : तुम्हाला कसं माहीत?

समाधान : काय?

रावसाहेब : कि मनाची खूप चांगली आहे ती.

समाधान : (गडबडतो) ते म्हणजे. आता तुम्ही इतके चांगले आहात तर तुमची मुलगी देखील तशीच असणार ना. हो कि नाही प्रसाद? बोल ना. हो बोल.

प्रसाद : हो तर. तुमची मुलगी नक्कीच मनाची चांगली असणार. याच्याशिवाय अजून कुणाला चांगलं माहीत असणार.

रावसाहेब : म्हणजे?

समाधान : तुम्ही या आता. तो भयसाटलाय. लंडनहून आलाय ना. लवकरच तुमची मुलगी घरी पोहोचेल तुमच्या. आपण सगळे धावपळ करू तिला शोधायला.

रावसाहेब : हो मी पोलिसातच चाललोय तक्रार करायला.

समाधान : हो जा. सावकाश जा. (ओरडतो.) ओ. पोलिसात काय पोलिसात. हा म्हातारा मला पोचवायलाच निघालाय. अहो वेड लागलाय

का? म्हणजे, आपल्या घराची इज्जत अशी चारचौघात. मला विचार करायला थोडा वेळ द्या. म्हणजे तुम्ही घरी जा. मला काही चांगली कल्पना सुचली ना तर..

प्रसाद : पिक्चर नाही बनवीत आहेत ते तुझ्या कल्पना ऐकायला.

समाधान : तू तोंड बंद ठेवशील जरा. नाहीतर तोंडात देईन हा तुझ्या ठेवून. तुम्ही या. मला विचार करू दे. कदाचित तिचा फोन येईल तुम्हाला.

रावसाहेब : तुम्हाला कसं माहीत?

समाधान : (वैतागतो.) मी ज्योतिषी आहे. कळालं. काही बोललो कि लगेच तुम्हाला कसं माहीत? तुम्हाला कसं माहीत? या आता (रावसाहेब जातो. सगळे रिलॅक्स होतात.)

समाधान : जा आधी बाहेर बोलावं त्या एड.....

प्रसाद : ए..

समाधान : त्या नेहाला बाहेर बोलावं. आपण बसुया.

प्रसाद : मग ती कशाला पाहिजे. माझंपण डोकं भणभणतंय. मी बाटली घेतो. तू ग्लास आण.

समाधान : हो. ए.. ग्लास आण काय ग्लास आण? बसुया म्हणजे काय प्यायला नाही बसुया. तिला बाहेर बोलावं आपण तिघं बोलत बसुया आणि ठरवूया आता पुढे काय करायचं.

प्रसाद : तेल लावत गेलास तू. आता पुढे काय, मागे काय ते तुझं तूच ठरव. पण जर प्रियाला काही त्रास झाला ना तर मग तू आहेस आणि मी आहे.

समाधान : मला इतका त्रास होतोय त्याचं तुला काय आहे काय रे? बॉक्सर आहेस तर काय सारखा घाबरवशील काय मला. जा नेहाला बोलावं. (प्रसाद रागाने पाहतो आणि मुठी आवळतो.)

समाधान : हे बघ. तू थांब इथेच. मीच बोलावतो तिला. (तो दरवाजा ठोकायला जातो. आणि नेहा दरवाजा उघडते आणि तो धाडकन आत पडतो. प्रिया उठते.)

प्रिया : काय झालं रे? सम्या किती धडपडतोस. आहेस का?

समाधान : आहेस का म्हणजे. आयला सगळेच माझ्या मरणावर.

प्रिया : काय झालं?

समाधान : काही नाही. तू झोप. ती बाबारावांची मांजर आली होती ना. तिला पकडत होतो.

प्रिया : आवाज नाही आला मग तिचा.

समाधान : (नेहाला पाहत) आता हातात आली कि आवाजच काढतो बघ तिच्या कानाखाली.

नेहा : हात तर लावून दाखव.

प्रिया : आता हे कोण बोललं.

समाधान : टीव्ही. टीव्ही मधून आवाज आला. (नेहाला बाहेर ढकलतो.)

प्रिया : हा कसला आवाज?

समाधान : (बाबारावांची मांजर हातात आलेय. तो मांजरीचा आवाज काढीत फिस्कारित नेहाला पळवित बाहेर घालवितो.)

प्रिया : नेहा कुठेय रे? (नेहा आत येऊन तिच्याजवळ बोलायला जात असते. सम्या तिच्या तोंडावर हात ठेवतो.)

समाधान : प्रसाद आणि नेहा टीव्ही बघतायत बाहेर. तू आराम कर. मी आहे त्यांच्या सोबत बाहेर.

प्रिया : मघाशी पण कसली तरी बडबड ऐकू येत होती रे.

समाधान : सीरिअल सुरु होती ना. ‘होणार सून मी या घरची.. ' तू आराम कर हा. मी दरवाजा बंद करतो. (नेहाला ढकलत बाहेर आणतो.)

समाधान : एक गुच्चा देऊ काय? तू चक्क मैत्रिणीला सांगून आलीस कि तू माझ्याशी लग्न करते आहेस?

नेहा: माझी खास मैत्रीण आहे ती.

समाधान : मग माझी का नाही ओळख करून दिलीस कधी?(नेहा रागाने त्याच्याकडे पाहू लागते.)

समाधान : म्हणजे, मी ओळखत नाही ना तिला.

नेहा : तिला आपलं काहीच माहीत नव्हतं. पण आपण लग्न करणार तर खास मैत्रीण म्हणून तिला तरी सांगायला नको का? म्हणून थोडंसच सांगितलं.

समाधान : तिला सांगायला नको काय सांगायला नको. खास मैत्रीण असली तर काय झालं? मी सांगितलं का प्रसादला. काय रे प्रसाद? (प्रसाद त्याच्याकडे रागाने पाहतो.)

समाधान : (आवंढा गिळत) म्हणजे. म्हणजे, हि कॉलोनी आणि सम्या कसं माहीत तिला?

नेहा: तिला जास्त काही माहीत नाही. तिने सम्या म्हणून ऐकलं होतं माझ्या तोंडून बस.

समाधान : बस काय. आता बस खालीच बसविणार होता तुझा बाप. कसला सांड आहे गं तो. वाटत नाहीस कि तू त्याची पोरगी आहेस.

नेहा : ए... (नेहा ओरडते.)

समाधान : म्हणजे... तू किती गोड आणि तो. वळू वाटतो वळू.

प्रसाद : सम्या आपण जरा मुद्द्याकडे वळू. प्रिया आत आराम करतेय. आता हिच्या बापाची. आय मिन बाबांची पुन्हा एन्ट्री होण्याआधी काय तो सोक्ष मोक्ष लाव या प्रकरणाचा. (पुन्हा बेल वाजते. समाधान पुन्हा टेन्स..

समाधान : प्रसाद, माझ्या मित्रा दरवाजा उघड. (समाधान हात जोडतो. प्रसाद दरवाजा उघडतो. तेव्हा कमळी आत येते.)

समाधान : हि आली पुन्हा डोकं चावायला. (म्हणत तिला घालवायला समाधान पुढे येतो आणि कमळी रावसाहेबला बोलावते.)

कमळी : या हो साहेब आत. (रावसाहेब आत येतो. समोर नेहा उभी. रावसाहेबला पाहून नेहा घाबरते.)

रावसाहेब : नेहा

नेहा : बाबा

समाधान : आईचा घो. प्रसाद आता काय?

कमळी : रावसाहेब इकडे या. (समाधानकडे पाहत) तुम्ही ओळखता यांना?

समाधान : (आवंढा गिळत) बसून बोलूया का आपण? तुम्ही बसा इथे सगळे. मी जरा पाणी पिऊन आलो.

कमळी : मी आणू का पाणी?

समाधान : तुम्ही विष आणा थोडंसं. पाणी आणतायत. बसा इथे. (ती बसते. तो किचनमध्ये जातो.)

समाधान : देवा, काहीतरी आयडिया दे रे. (पाणी पितो.) अजून एक घोट पितो. काय माहीत नंतर पाणी मिळेल कि डायरेक्ट शेवटचं पाणी तोंडात टाकतील गेल्यावर.

कमळी : समाधान साहेब, झालं का पाणी पिऊन?

समाधान : मी मेल्याशिवाय हिचं काय समाधान होणार नाही.

(समाधान येऊन बसतो. सगळे समाधानकडे पाहू लागतात. समाधान बोलायला जातो पण बोलू शकत नाही. दोन चार वेळा असेच होते.)

प्रसाद : actually नेहा माझी….

समाधान : प्रसाद. मी सांगतो सगळं. खूप लपवा छपवी झाली.

(सगळे समाधान आता काय खरं सांगतोय ते ऐकू लागतात.)

नेहा खूप चांगली मुलगी आहे. आणि आमचा प्रसादपण. प्रसाद लंडनला राहतो. इथे पण त्याचं घर आहे मुंबईमध्ये. तो माझा खास मित्र आहे.

कमळी : तुमचा दोस्ताना संपला असेल तर थोडं पुढे सरका.

रावसाहेब : नेहा, तुला प्रसाद आवडतो का? तुला जर खरंच प्रसाद आवडत असेल तर मला तसं सांग. मी स्वतः ठरलेलं लग्न मोडेन तुझं.

प्रसाद : ए, काय चाललंय. अहो..

(इतक्यात प्रिया येते. समाधान अजून टेन्स.)

प्रिया : काय गडबड सुरु आहे.

कमळी : अय्या बाईसाहेब. तुम्ही घरीच होतात. बरं झालं आता तुमची हेडलाईट जरी उडाली असेल तरी तुम्हाला हा समोरचा हायवे क्लीअर दिसेल आज.

प्रिया : कमळी, कसला हायवे? काय झालं? अजून कोण आहे इथे? प्रसाद, नेहा अरे बोला ना काहीतरी.

प्रसाद : प्रिया, ते नेहाचे बाबा आले आहेत.

प्रिया : अरे वाह. सासरेबुवा आले का तुझे?

प्रसाद : ए. अगं.

समाधान : हो ना. त्यांचा ना काहीतरी गैरसमज झालाय. प्रिया मला सांग नेहा कोण आहे?

प्रिया : मुलगी.

समाधान : अगं म्हणजे प्रसादची कोण आहे.

प्रिया : बायको.

समाधान : आणि तू?

प्रिया : मी तुझी म्हणजे सम्याची बायको.

समाधान : झालं क्लीयर. आता मिटिंग संपली.

प्रिया : कसली मिटिंग?

रावसाहेब : माझा थोडा गैरसमज झाला होता. मला नेहाने आधी सांगितलं असतं कि तिला प्रसाद आवडतो तर मीही तयार झालो असतो ना या लग्नाला.

प्रिया : तयार झालो असतो म्हणजे..? अहो ऑलरेडी त्यांचं लग्न झालंय. काय रे सम्या?

समाधान : हो म्हणजे..

प्रसाद : (जागेवरून उठत) सम्या.. येतो मी.

प्रिया : प्रसाद, काय रे.. तू नक्की लग्न केलंयस ना नेहा सोबत?

प्रसाद : अगं प्रिया.

कमळी : नसेल झालं तर आपण लावून देऊ.. काय समाधान साहेब? देऊया ना या दोघांचं लग्न लावून. (समाधान घाम पुसतो.)

प्रिया : बरोबर बोलतेय कमळी. नसेल झालं तर काय झालं. उद्याच आपण प्रसाद आणि नेहाचा साखरपुडा करू. तोही याच घरात. (प्रसाद आणि नेहा दोघेही टेन्स.) काय गं नेहा?

नेहा : बाबा.

रावसाहेब: नेहा, एका शब्दाने बोलली असतीस. मी तुझ्या सुखाच्या विरुद्ध का होतो? पोरीच्या सुखातच बापाचं सुख. असो. मला मुलगा पसंत आहे.

प्रसाद : अहो असं कसं पसंत आहे. सम्या.

समाधान : चूप वेडा. मी आहे ना. तू नको टेन्शन घेऊ.

कमळी : काहीतरी गडबड वाटतेय मला.

समाधान : हिचा डोका फोडू काय रे? कमळी बाई, निघा आता.. तुमचा डिटेक्टिव्ह बनण्याचा किडा जास्त वळवळू देऊ नका. उद्या नेहा आणि प्रसादचा साखरपुडा आहे. समजलं ना?

कमळी : मग मला खोटं का बोललात कि या दोघांचं लग्न झालंय म्हणून?

समाधान : ए, (पुढे तिच्या अंगावर जात) तू काय समजते काय स्वताला..

कमळी : हे बघा. जास्त पुढे पुढे येऊ नका. बाईसाहेब. साहेबांना आवरा.

प्रिया : समाधान, अरे काय चाललंय.

समाधान : माझं काय नाय चाललंय. हिच डोक्यात चाललेय. ती माझी बंदूक कुठे ठेवली आहेस तू?

कमळी ; (आश्चर्याने) अय्या, तुमच्या घरी बंदूक आहे..

समाधान : हो ना. माझे बाबा पण मिल्ट्रीमध्ये होते ना. आता माझी सटकली. आता जर तू पुन्हा दिसलीस ना मला इथे तर. गोळयांचं घालतो बघ तुला.

कमळी : अहो पण.

समाधान : प्रसाद बंदूक आण माझी. (कमळी पळते.)

प्रिया : सम्या अरे काय चाललंय तुझं.. नेहा तू आज इथेच थांब. बाबांना जाऊ दे. उद्या मस्त जोरदार साखरपुडा करू आपण तुझा. काय प्रसाद?

प्रसाद : प्रिया, मी काय म्हणतो.

समाधान : आता तू पुन्हा काही म्हणू नकोस. नेहाच्या बाबांना जाऊ दे. आपण रात्री सगळं नीट प्लॅनिंग करू हा. नेहा बाबांना जायला सांग.

रावसाहेब : माझ्या एकुलत्या एक लेकीचा साखरपुडा.. किती स्वप्न पहिली होती मी? असो.. (डोळे पुसत) येतो. सकाळी लवकर येईन मी. मलाही थोडी तयारी करायला हवी. (तो जातो.)

प्रिया : चला आता आपण पण जरा तयारीला लागूया. वेळ कमी आहे. चल सम्या.

(ती बेडरूममध्ये जाते. तो तिच्या मागून. नेहा व प्रसाद एकमेकांकडे पाहत तिथेच बसतात. प्रिया कपाट उघडते. तिला बीजी करून सम्या बेडरूम मधून येऊन सोफ्यावर रिलॅक्स बसतो.)

प्रसाद : देवाने तुला अक्कल नावाचा भाग दिला आहे काय रे? तुला हिच्यासोबत लग्न करायचंय आणि माझा साखरपुडा ठरवून टाकलास?

सम्या: अरे मी कुठे ठरविलं. ते प्रियाने..

नेहा : मग तुला नाही थांबविता आलं का तिला. मी काय मेणाची बाहुली आहे का? एकदा इकडे. एकदा तिकडे.

सम्या : मी काय म्हणतो.

प्रसाद : कानफाट फोडेन आता जास्त बोललास तर. (तो तोंडावर बोट ठेवून बसतो.)

नेहा : अरे असा आईचा श्याम होऊन काय बसला आहेस. आता काय करायचं ते सांग ना. जर का तू आता बोलला नाहीस ना तर मी आताच खिडकीतून उडी मारून जीव देईन.

सम्या : अरे काय चालवलंय काय? हा बोलतो बोललास तर कानफाट फोडेन. तू बोलतेस नाही बोललास तर जीव देईन. मी काय डोंबाऱ्याचा ढोल आहे का कि दोघांनी दोन्ही बाजूने बदडाल. नेहा, तुझ्या बापाने तरी खिडकीतून ग्यालरीत उडी मारून जीव दिला होता का कधी.. आपल्या खिडकीबाहेर ग्यालरी आहे. ग्यालरी मधून जरी उडी मारलीस तरी खाली स्विमिंग पूल आहे. जीव कशी काय देणार तू? त्यात खाली कमळी उभी असेलच तुझी क्याच पकडायला. नॉन्सेन्स.

दोघे : सम्या.

सम्या : ओरडू नका. मला विचार करू दे. आधीच नाकी नऊ आले आहेत माझ्या. चला वरच्या रूममध्ये. आपण तिथे बसून चर्चा करू. (प्रसाद रागाने पाहतो.)

प्रसाद : चर्चा?

सम्या : तोडगा काढू. तोडगा. चला. (तिघे वर जातात. प्रिया बाहेर येते. सेंटर टेबलवरचं रिमोट उचलते आणि टीव्ही लावण्याचा प्रयत्न करते. रिमोट काम करीत नाहीये. टीव्ही सुरु होत नाही.)

प्रिया : (ती रिमोटचे सेल काढून घेते. सेल जिभेच्या टोकाला लावून पाहते.) सेल डाऊन झाले असतील. नवीन सेल आणायला सांगते उद्या सम्याला. (म्हणत ती किचनमध्ये जाऊन पाणी पिऊ लागते. नेहा समाधान सोबत भांडत येते.)

नेहा : मला तुझं जराही ऐकायचं नाहीये. किती खोटारडा आहेस तू. तुला लाज नाही वाटत असं मला दुसऱ्याच्या गळयात.. . (प्रियाला समोर पाहून दोघे तिथेच उभे राहतात. समाधान घामाघूम.

मागून डोकं उशीने दाबत प्रसाद येतो. तोही प्रियाला पाहून तिथेच थांबतो.)

प्रिया : कोण भांडतंय रे? नेहा आणि प्रसाद भांडतायत कि काय?

प्रसाद : (उशीने सम्याला मारतो.) मी नाही गं. मी कशाला भांडू. ह्या सम्याने..

समाधान : मी. मी टीव्ही लावला ना. त्यात भांडण सुरु आहे.

प्रिया : हो का. पण नेहमी भांडणांच्याच सीरिअल कश्या काय लावतोस?

समाधान : चल असं काही नाही. हे बघ आता चॅनल चेन्ज करून दाखवितो. रिमोट कुठेय? (प्रसादला) ये शेमल्या तो रिमोट दे ना.

प्रसाद : (रागावत) सम्या.

समाधान : हा.. हा बघ रिमोट. (तो रिमोट उचलतो. रिमोट्चे सेल प्रियाच्या हातात आहेत.) आता बघ मी एक एक चॅनल चेंज करून दाखवतो तुला. (प्रसाद कपाळाला हात लावून तिथेच बसतो. तो चॅनल चेंज करीत. वेगवेगळे आवाज काढून ऍक्टिंग करतोय.)

पोगो चॅनेल..

छोटा भीम को मिलने को आया एक सुपरहिरो... फ्लाईंग जट इन ढोलकपूर. (छोटा भीमच्या कार्टून आवाजात) फ्लाईंग जट तुझे मुझसे लड़ना पडेगा. लड़ना पडेगा तुझे मेरे साथ. मेरे साथ लड़ने के लिये तैय्यार हो जाओ.

एनिमल प्लॅनेट.

अब ये नर मादा की ओर आकर्षित होने लगा है.. अब वो मादा के पास पहुँच गया है.

बीबीसी..

मिस्टर ट्रंप वॉण्टस टू जॉईन हिम. मिस्टर प्रेसिडेंट इस दी फर्स्ट परसन हू डूइंग धिस जॉब विथ लॉट ऑफ़ अग्रेशन.

इंडिया टीव्ही..

गौर से देखो इस इन्सान को.. ये वोही इन्सान है. इसकी भोली सूरत पे मत जाना. ये वोही है जिसने.

एबीपी माझा.

नऊ थर लावले होते.. जर माननीय कोर्टाने या गोष्टीसाठी विरोध केला होता तर मग तुम्ही याचं राजकारण का केलंत. हे पहा वेळ फार कमी उरलेला आहे. फक्त तीस सेकंदामध्ये तुम्ही याचं उत्तर द्या. बोला.

नाईन एक्स..

तुने मेरे जाना. कभी नही जाना. इश्क मेरा.. इश्क मेरा..

समाधान : (शेवटी थकतो.) आता थांबतो. इतकेच चॅनल दिसतायत आज. (म्हणत रिमोट बाजूला ठेवतो. ती त्याच्या हातात सेल देते.)

प्रिया : हे रिमोट मध्ये टाकलेस की अजून चॅनल दिसतील (म्हणत ती प्रसादकडे वळते.)

प्रसाद : मी काही नाही केलं. हाच माकडउड्या मारीत होता. तू बस मी आता तुला सगळं खरं खरं सांगतो.

प्रिया : प्रसाद तू पण होतास इथे? (सम्या दात ओठ खात प्रसादकडे पाहतो.)

समाधान : गम्मत. गम्मत. करीत होतो गं मी.

प्रिया : माझ्या आंधळेपणाचा मजाक उडवीत होतास तू?

समाधान : नाही गं. ते आपलं नेहा आणि प्रसाद मध्ये थोडं तू तू. मी. मी. सुरु होतं ना.

प्रसाद : ए.

समाधान : ए काय ए. शोभतं का तुला असं भांडण करणं.

प्रिया : सम्या, कधी कधी मला असं का वाटतं की तुला मी नकोशी झालेय. तसं असेल तर सांग हा बिनधास्त. आपण लगेच घटस्फोट घेऊ. (नेहा त्याला खुणावते.)

समाधान : चल, तुझं आपलं काहीतरीच. काही नाही ते मी थोडा कन्फ्युज झालोय गं.

प्रिया : मीही थोडी कन्फ्युज झालेय. नेहा तू घरी थांब आम्ही तिघे जरा बाहेर जाऊन येतो.

समाधान : आता बाहेर काय काम आहे?

प्रिया : उद्यासाठी काही वस्तू घ्यायच्या आहेत. चल आता. (तिघे जातात. ती दरवाजा बंद करीत वरच्या रूममध्ये जाते. काळोख.)

## प्रवेश 5

(संध्याकाळची वेळ. घरात काळोख. खिडकीतून पेपरवाला आत येतो व सगळीकडे शोधाशोध सुरु करतो.)

पेपरवाला : कमळीताई तुझा हा डिटेक्टिव बारक्या दि ग्रेट. इथे पोहोचलाय. इथले सगळे झोल आज मी तुझ्यापर्यंत पोहोचवणार. समाधानबाबू. एक बार मेने कमिटमेंट कर दी फिर में पड़ोसन की भी नही सुनता. त्या दिवशी मला घरातच घेत नव्हते काय? आज दरवाजा बंद केला तर आपण पायपावर चढून खिडकीतून आलो. आय एम स्पायडरमॅन. ये बारक्या का स्टाईल है.. (शोधाशोध करताना त्याला किचनमध्ये केळी सापडतात तो मस्त शानमध्ये केळी खातो.) अरे आपण काय खायला आलो कि डिटेक्टिवगिरी करायला? (तो पुन्हा शोधाशोध सुरु करतो. तेव्हा नेहा हातात दिवा घेऊन येते तो घाबरून लपतो.) त्याच्या आयला यांच्या घरी भूत आहे? (त्याची तारांबळ उडते. तो इकडे तिकडे तिच्यापासून लपून पळतोय. दिवा घरातून फिरवून ती लाईट्स ऑन करून पुन्हा वरच्या रूममध्ये निघून जाते.) भूत लाईट लावून जातो यांच्या घरी...? आईच्या गावात बाराच्या भावात. (तो टेन्स. इतक्यात बेल वाजते. तो खिडकीतून पळणार इतक्यात नेहा येते म्हणून तो लपतो. नेहा दरवाजा उघडते प्रसाद, समाधान आणि प्रिया आत येतात.) आईच्या गावात हि भूत नाही? नशीब ओरडलो नाही नायतर आज कॉलनी वाल्यानी वरात काढली असती माझी.

प्रिया : प्रसाद सगळं सामान नीट ठेव. आणि काय रे तुला काय झालंय. सामान का घेऊ देत नव्हतास. नेहा लक्ष ठेव हा तुझ्या नवऱ्यावर. (प्रसाद सामान घेऊन वरच्या रूमवर जातो.) दुसरी कोण आवडली नाही ना याला. पुरुषांचा काय भरोसा. दिसली मासोळी की टाकलं जाळं. काय समाधान?

समाधान : हो ना,

प्रिया : काय?

समाधान : काय नाय. आपलं. नेहा प्रियाला बेडरूममध्ये ने पाहू. (समाधान नेहाला प्रियाला बेडरूममध्ये नेण्यासाठी खुणावतो. नेहा प्रियाला बेडरूममध्ये सोडून येते.)

समाधान : आता पुढे काय करायचं.

नेहा : मला काय विचारतो आहेस? सांग माझ्या बाबांना कि प्रसाद नाही तूच माझा नवरा आहेस. म्हणजे तुला माझ्यासोबत लग्न करायचंय.

समाधान : अगं पण कायद्यानुसार तसं नाही करता येणार आता. प्रिया सोबत लग्न झालंय माझं. मग आताच आपल्याला कसं काय लग्न करता येईल?

(पेपरवाला सगळं ऐकत आहे.)

नेहा : एक काम करते. मी जाऊन जीव देते. कारण तुला सोडून दुसऱ्या कुणाचा मी विचारच करू शकत नाही.

समाधान : मला आजची रात्र दे. प्लिज, उद्या आपला हा प्रॉब्लेम मी नक्कीच दूर करेन.

नेहा : अरे पण उद्या माझा आणि प्रसादचा साखरपुडा झाला की मग हालचाल करणार आहेस का तू?

समाधान : तू टेन्शन नको घेऊ मी करतो काहीतरी. (तो तिला प्रेमाने जवळ घेतो. ती त्याला दूर करून वरच्या रूममध्ये निघून जाते. समाधान तिच्या मागून जातो.)

पेपरवाला : आयला जबरदस्त लफडा आहे हा. साहेब इतके झोलर दिसत नाहीत चेहऱ्यावरून पण जाम झोलर आहेत. म्हणजे त्या दिवशी बाईसाहेब नव्हत्या. ह्याच नवीन बाईसाहेब होत्या वाटतं घरात. डबल मजा है और कम दाम. एम आर कॉफी जिसका नाम. सगळी खबर कमळी ताईला द्यायला हवी. (अचानक प्रिया बेडरूम मधून बाहेर येते. प्रिया त्याच्या समोर येऊन उभी राहते. त्याची बोबडीच वळते. तो घाबरतो. त्याच्या तोंडून शब्द बाहेर पडत नाहीत. तो हात जोडतो. पाया पडायला तिच्या समोर साष्टांग नमस्कार घालतो आणि ती त्याच्या पाठीवर पाय देऊन उभी राहते. तिच्या वजनाने पेपरवाला कासावीस होतो. ती पुढे जाते. थांबते.)

प्रिया : सम्याने हे मधेच काय ठेवलंय. त्या मुर्खाला कळत नाही का कि, मला डोळ्यांनी दिसत नाही ते. आता पडले असते तर. (तो उठायला जातो. ती वळते. तो पुन्हा झोपतो. ती परत त्याच्या पाठीवर उभी राहते. त्याचा जीव जात असतो. तोंडावर हात ठेवून तो ओरडणे दाबत असतो.) हि तर गादी वाटतेय. पण

सम्याने मधेच कशी काय ठेवली. (ती त्याच्या पाठीवरून उतरते. तो रिलॅक्स होतो.) सम्या पण असा मूर्ख आहे ना. अशी मधेच गादी टाकून गेला. (ती वळते हा पुन्हा झोपतो.) थांब लाथ मारून बाजूला करते. (हात जोडून तो नको नको म्हणतोय. आणि ती लाथ उगारते. तो डोळे गच्च मिटतो.) नको लाथ नको मारायला. मजबूत दिसतेय उगाच पाय हातात यायचा. (तो पुन्हा रिलॅक्स होतो. इथे काठी होती ना कुठेतरी. तिने ढोसकून ढकलते. त्याच्या चेहऱ्यावर दयनीयता. बाजूला भिंतीशेजारची काठी ती घेते आणि जोरात त्याचा पोटात मारायला जाते. तो हात जोडून नको बोलत हळूच ओरडतो. 'अअअअअ.. ' तिच्या हातून काठी खाली पडते.) अगंबाई हा कसला आवाज? काठी कुठे पडली माझी. ( ती त्याला हात लावणार तोच तो काठी उचलून तिला देतो. ती काठी घेते.) काठी कुणी दिली माझ्या हातात? सम्या. खरं सांग तू इथेच आहेस ना? (तो रेंगत रेंगत खिडकीकडे जातो.) थोडं पाणी दे ना रे. खूप तहान लागलेय. तहानेने जीव व्याकुळ झालाय रे. (त्याला वाईट वाटतं. तो उठतो आणि किचन मधून पाणी आणून तिला देतो. ती पाणी पिते.) थँक यु. किती चांगला आहेस रे तू. किती काळजी घेतोस माझी. इकडे ये माझ्या शेजारी बस पाहू. (तो बसायला जात असतो. इतक्यात समाधान वरून येताना धडपडतो आणि पेपरवाला वाऱ्याच्या वेगाने खिडकीतून बाहेर पळतो.)

समाधान : काय झालं. एकटीच काय बसली आहेस?

प्रिया : अरे एकटी कुठे तुझ्यासोबत तर गप्पा मारीत होते. तू इथे बसला होतास मग तिकडे कुठे धडपडलास आणि तू इथे काय टाकून ठेवलं आहेस रस्त्यात.

समाधान : कुठेय काय? आणि मी तर आत्ताच आलो.

प्रिया : अरे तू पाणी दिलंस ना मला प्यायला. (खिडकीतून पेपरवाला पाहू लागतो.)

समाधान : हे बघ प्रिया. ओके जस्ट चिल. रिलॅक्स हो. तुला कदाचित भास झाला असेल. तू थोडा आराम कर. आज मी तुझ्या आवडीचा पिझ्झा मागवलाय.

पेपरवाला : मला पण आवडतो पिझ्झा. एक्स्ट्रा चीझ वाला.

प्रिया : सम्या किती आवड निवड पाहतोस रे माझी. किती काळजी करशील. जर त्या स्फोटात मी मेले असते तर. (तो तिच्या तोंडावर हात ठेवतो. वरून नेहा खाली येते. ती त्या दोघांना पाहते. समाधान तिच्याकडे पाहतो. आणि खाली मान घालतो..)

पेपरवाला : एक तरफ है घरवाली. एक तरफ बाहरवाली. कमळीताई यु आर ग्रेट. तेरा डाउट सच है बहना.. समाधान साहब. आपका क्या कहना. (इतक्यात बेल वाजते. समाधान जाऊन दरवाजा उघडतो. इन्स्पे आत येतो.)आईच्या गावात. बाराच्या भावात. भागो.

(तो पळतो.)

इन्स्पे : काय भोळे साहेब येऊ का घरात? माफ करा थोडा उशिराच आलो. म्हंटलं ऑफिसमधून आला असाल आता. किती दिवस झाले

आला नाहीत तुम्ही पोलीस स्टेशनमध्ये बायकोची चौकशी करायला?

समाधान : ते प्रिया आली घरी.

इन्स्पे: मग तुम्ही फोन करून का नाही सांगितलंत?

समाधान : नाही म्हणजे ती आजच आली ना. (प्रिया गॉगल लावते.)

इन्स्पे : प्रिया जी, नमस्कार मी इन्स्पे रमाकांत सोनावणे. कधी आलात तुम्ही?

प्रिया : आताच थोड्या वेळापूर्वी. आणि मी ब्लास्टमध्ये नव्हते साहेब. (तिघेही तिच्याकडे वळतात.) समाधानला लेट झाला म्हणून मी रागाने तिथून निघून गेले. आणि समोर रोड क्रॉस केला इतक्यात जोराचा ब्लास्ट झाला. मी खूप घाबरले होते. तेव्हा समाधानला तिथे येताना पाहिलं आणि त्याच्या रोज लेट येणं. माझं न ऐकणं या गोष्टीसाठी मी त्याला धडा शिकवायचं ठरवलं आणि आठवडाभर एका मैत्रिणीकडेच राहिली. त्यालाही कळू द्यायचं होतं कि कुणीतरी आपली वाट पाहत असतं तेव्हा त्याच्या मनाची काय अस्वस्था असते ते.

इन्स्पे : (हसतो.) प्रत्येक बायकोने नवऱ्याला असा धडा शिकवलाच पाहिजे. वेरी गुड. चला आता मी निघतो. माझं काम झालं. सॉरी समाधान साहेब. जर काही कडक बोललो असेन तर माफ करा.

इच्छा नसतानाही आम्हाला कडक रहावच लागतं हो. चला गुड लक. (इतक्यात प्रसाद येतो.) हे कोण ?

समाधान : हा प्रसाद माझा मित्र. आम्ही दोघेही निघालो होतो पोलीस स्टेशनला आणि प्रिया घरी आली.

इन्स्पे : ओ के. ओ के. चला येतो मी. (दरवाजातून पुन्हा परत येतो. प्रियाला उद्देशून) प्रियाजी तुम्ही. गॉगल का लावला आहात?

प्रिया : नाही साहेब. ते डोळे.. आले आहेत माझे. (सगळे खटकन तिच्याकडे पाहतात.)

इन्स्पे : (हसतो.) माझ्या बायकोचे पण. तिचे पण डोळे आले आहेत. खिश्यातून गॉगल काढतो. हे बघा आताच तिच्यासाठी गॉगल घेतला त्या तुमच्या कॉलोनी समोरच्या चश्मेवाल्याकडून. पैसे देऊन घेतला बरं का. पैसे देऊन. पोलिसाने कोणती गोष्ट घेतली असं कुणी ऐकलं कि सगळयांना फुकटच घेतली असं वाटतं. म्हणून प्रत्येकाला सांगावं लागतं नेहमी. चला बाय (इन्स्पे निघून जातो. प्रसाद जाऊन दरवाजा बंद करतो. प्रिया सोफ्यावर बसली आहे आणि तिघेही तिच्यासमोर येऊन गुन्हेगारासारखे उभे राहतात.)

प्रिया : (उठून खिडकी जवळ जाऊन उभी राहते.) काय झालं सगळे शांत का?

प्रसाद : प्रिया तू आंधळी नाहीस? म्हणजे तुला दिसतंय सगळं?

समाधान : आय एम सॉरी प्रिया. मला माफ कर. मी चुकलो.

प्रिया : (हसते.) अरे काय चाललंय तुमचं? आल्यापासून पाहतेय सॉरी. चुकलो. सॉरी. चुकलो. हेच सुरु आहे तुमचं. मला भूक लागलेय. तुम्हाला नाही लागली का भूक.

सगळे : भूक लागलेय?

प्रिया : हो. मी जर आंधळी नसते ना तर अर्ध्या तासात सगळा स्वयंपाक बनवला असता. आणि आज मला दिसत नाही तर तुम्ही लोक फक्त माझ्या चौकश्या करताय. सॉरी बोलताय. चुकलो बोलताय. कधी येणार रे सम्या तुझा पिझ्झा. मला जोरदार भूक लागलेय आता. आणि मला खरंच काहीच नाही दिसत.

प्रसाद : मग तू इन्स्पेक्टरला असं का सांगितलस सगळं उलट सुलट.

प्रिया : तसं नसतं सांगितलं ना तर आपल्याला शंभर फेऱ्या माराव्या लागल्या असत्या पोलिस स्टेशनमध्ये. रोज सिरिअल पहायचे हो मी.

समाधान : आणि ते डोळे आले आहेत म्हणून बोललीस.. ते?

प्रिया : मग काय बोलू? मैत्रिणीकडे गेले तेव्हा तिने डोळे काढून घेतले. आणि कायमचे नाही गेले आहेत माझे डोळे समजलं ना. डोक्याला मागे मार बसलाय ना त्यामुळे झालंय ते. डोळे कायमचे गेले असते तर मी इतकी आरामात गप्पा मारत बसले असते का? (सगळे रिलॅक्स होतात. हळू हळू काळोख.)

## प्रवेश 6

(सकाळ. समाधान बसला आहे. प्रसाद येतो.)

प्रसाद : तू इथे आरामात बसला आहेस? सम्या मला तुला काहीतरी खूप महत्वाचं सांगायचंय.

समाधान : प्रसाद, मला थोडा विचार करू दे. माझं डोकं काम करायचं बंद झालं आहे. साला, एक झाकतो तर दुसरं उघडतं. अजून किती खोटं बोलू. काय शिल्लकच नाही राहिलं आता.

प्रसाद : प्रियाला आताच सगळं खरं खरं सांगून टाक.

समाधान : त्यापेक्षा तू मला चितेवरती टाक. अरे बेल वाजली रे वाजली कि धडधडायला लागतं रे मला. सकाळ पासून दहा वेळा बेल वाजली नसताना पण दरवाजा उघडून पाहतोय. आता उघडाच ठेवलाय दरवाजा. आज काय ती माझी वरात निघूच दे. अरे तो रावसाहेब येईल आता. त्या रावसाहेबाला काय सांगू. त्याचा एक हात पडला ना रे तर मी होत्याचा नव्हता होईन रे. (इतक्यात सोनार नवीन नेकलेस द्यायला येतो.)

सोनार : नमस्कार साहेब.

समाधान : ए. तुम्ही इथे काय करताय?

सोनार : सॉरी हा लेट झाला. हे तुम्ही गेल्या आठवड्यात बनवायला दिलेले दागिने आणि हे मंगळसूत्र.

नेहा : (गेस्टरूम मधून खाली येते.) अय्या, माझ्यासाठी दिलं होतं? हि तर माझ्या आवडीची डिजाईन आहे. सो क्युट.

समाधान : हो तुझ्यासाठी. (प्रिया समोरून येते. तिला पाहताच) ते प्रसादने सांगितलं होतं ना मला फोन करून लंडनहून.

प्रिया : कोण आलय सम्या?

सोनार : मी समर्थ ज्वेलर्स मधून आलोय. ते लग्नाचे दागिने द्यायचे होते ना.

समाधान : सोनार साहेब तुम्ही या आता. आणि तुम्ही कशाला आलात. मीच आलो असतो ना दुकानात.

सोनार : तुमचा फोन बंद होता ना. म्हणून मी म्हंटलं आपणच जावं.

समाधान : हो सत्यनारायण होता ना आमच्याकडे. सहकुटुंबचं यायचं ना.

सोनार : पहा नशिबात प्रसाद असला कि चुकत नाही. द्या प्रसाद द्या.

समाधान : यालाच घेऊन जा. याचच नाव प्रसाद आहे. अहो याच्यासाठी हे दागिने बनविले होते मी. तुम्ही या आता. पैसे सगळे ऍडव्हान्स दिले ना मी. मग या तुम्ही. याचं लग्न झालं आणि आम्ही सत्यनारायण ठेवला ना कि बोलावतो तुम्हाला.

सोनार : हो. हो. नक्की बोलवा. येतो मी (तो जातो.)

समाधान : त्याच्या आयला. जत्राच फुलली माझ्या घरी. एक गेला कि दुसरा येतो.

प्रिया : सम्या, मला असं का वाटतंय कि तू माझ्यापासून काहीतरी लपवतोयस.

समाधान : मी.. छया. मी काय लपवणार. साला जरा रिलॅक्स नाय झालो कि टपकतो कोणतरी. घे बघ दागिने पण आले ना आता.

प्रिया : मग तू काल का बोलला नाहीस दागिन्यांबद्दल.

समाधान : ते. ते विसरलो गं मी.

प्रिया : तू विसरलास ठीक आहे पण प्रसाद कसा काय विसरला?

प्रसाद : प्रिया.

समाधान : तू थांब रे. जरा काय झालं कि धावला पुढे. मी सांगतो तिला. (विचार करीत) हा. त्याचं काय झालं माहितेय. प्रसादने मला तिकडून म्हणजे लंडनहून फोन करून कळवलं होतं. कि दागिने घे आणि ठेव तुझ्याकडे. मी आलो कि प्रियाला टोटल सरप्राईज देऊ आपण. (घाम पुसतो.)

प्रिया : अरे पण..

समाधान : प्रिया, मी थकलोय गं आता बोलून बोलून आणि तुला उत्तरं देऊन माझा श्वास बंद होत आलाय. (सोनार परत येतो.)

सोनार : साहेब, हे बिल घ्या. बिल द्यायलाच विसरलो तुम्हाला.

समाधान : सुरळी करा त्या बिलाची आणि.. द्या. त्या प्रसादच्या हातात द्या.

सोनार : तुम्हाला नवीन लग्नाच्या शुभेच्छा हा.

समाधान : थँक यु. ए, अरे माझं नाही याचं लग्न होणार आहे.

सोनार : पण तुम्ही तर म्हणाला होतात कि तुमचं लग्न आहे म्हणून.

समाधान : असं बोललो होतो मी? गम्मत, गम्मत केली मी तुमची. अहो तुम्हाला काय फरक पडतोय. कोणाचं का लग्न असेना. तुम्हाला तुमचे पैसे मिळाले ना? मग निघा आता. (तो जातो. समाधान वळतो. समोर प्रिया उभी. तो दचकतो)

प्रिया : सम्या.

समाधान : नको गं प्रश्न विचारू आता. जीवाला कंटाळलो आहे मी आता.

प्रसाद : मग कोणी सांगितलं होतं तुला अशी नको ती लफडी करायला.

प्रिया : कसली नको ती लफडी. (समाधान डोक्यावर हात मारतो.)

समाधान : अगं. तो दागिने वगैरेबद्दल बोलतोय. (नेहाचा बाप येतो.)

रावसाहेब : हे काय दरवाजा का उघडा ठेवलाय.

समाधान : यांच्या साखरपुड्याची तुतारी गावभर ऐकायला गेली पाहिजे ना म्हणून. शाळेत उभ्या आयुष्यात मी जितकी उत्तरं दिली नसतील. तितकी उत्तरं मी प्रत्येकाला गेल्या दोन दिवसात देतोय.

रावसाहेब : नेहा हे घे दागिने. मुद्दाम तुझ्यासाठी बनवून ठेवले होते.

समाधान : आपण ज्वेलरी शॉप टाकूया का?

प्रसाद : थोड्या वेळाने अपंगांचा टेलिफोन बूथ टाकायची वेळ येणार आहे तुझ्यावर. आता खूप झालं. प्रिया. (प्रसादला थांबवित)

समाधान : हो खूप झालं. म्हणजे खूप वेळ झाला. चला आता कार्यक्रमाला सुरुवात करूया.

प्रिया : दोघांनी इथे या सोफ्यावर बसा पाहू. (दोघे बसतात.) सम्या, काल मी घेतलेल्या अंगठ्या आण आणि दे पाहू माझ्या हातात. (समाधान जाऊन अंगठ्या आणतो आणि थरथरत्या हाताने तिला देतो.) चला आता दोघांनी या अंगठ्या एकमेकांच्या बोटात घाला पाहू.

समाधान : आपण थोडा वेळ थांबूया का?

प्रिया : अरे आताच तू बोललास ना कि कार्यक्रम सुरु करूया.

समाधान : असं बोललो मी. देवा.. काहीतरी कर रे. (प्रसादचा मोबाईल वाजतो.)

प्रसाद : (मोबाईल पाहत घाम पुसतो आणि कॉल उचलतो. टेन्शनमध्ये) हॅलो.

प्रिया : इकडे दे पाहू मोबाईल. स्वतःचा साखरपुडा सोडून फोन वर गप्पा मारतोय. हॅलो,कोण बोलतंय. कोण लारा?

समाधान : (हसत) ब्रायन लारा कि लारा दत्ता ते विचार ना?

प्रिया : प्रसादची बायको लारा.

सारे : काय? (प्रसाद तिच्या हातातून फोन घेतो.)

प्रसाद : मी तुला नंतर फोन करतो. हो, प्रियाच होती. ती नंतर बोलेल तुझ्यासोबत. चल बाय.

रावसाहेब : म्हणजे तुमचं लग्न झालंय?

प्रिया : तुझं already लग्न झालंय प्रसाद?

समाधान : तुझं already लग्न झालंय प्रसाद?

प्रिया : तू बोलला नाहीस मला?

समाधान : तू बोलला नाहीस मला?

प्रसाद : अरे बोलायला द्याल तर बोलेन ना. आल्यापासून नुसता तुमच्या लफड्यात गुरफटून टाकलात तुम्ही मला.

रावसाहेब : तुमचं लग्न झालंय मग माझ्या मुलीसोबत साखरपुडा का करीत होतात?

प्रसाद : मी नव्हतो करणार साखरपुडा.

रावसाहेब : मग काय नाटक करीत होतात साखरपुड्याचं?

प्रसाद : हो. नाटक करीत होतो.

प्रिया : अरे पण का?

प्रसाद : ते तुझ्या नवऱ्याला विचार. नेहासोबत माझं नाही समाधानचं लफडं आहे.

रावसाहेब : काय? अरे नक्की काय चाललंय कुणी मला सांगेल काय?

नेहा : मी सांगते.

समाधान : थांब नेहा, मीच सांगतो. म्हणजे माझं आणि नेहाचं. आमचं दोघांचं एकमेकांवर प्रेम आहे.

रावसाहेब : (रागाने) काय नालायकपणा लावलाय हा. नेहा काय ऐकतोय मी हे.

नेहा : बाबा. माझं समाधानवर प्रेम आहे.

रावसाहेब : लाज वाटते का तुला? अगं त्याची बायको तुझ्यासमोर उभी आहे आणि तिच्या आंधळेपणाचा फायदा उचलताय तुम्ही? तिच्या मागे हा खेळ चालवलाय तुम्ही?

प्रिया : (गॉगल काढीत) माझ्या मागे नाही. माझ्यासमोर. (सगळे दचकतात.) मला सगळं दिसतंय. माझे डोळे कधीच गेले नव्हते. जो खेळ चालला होता तो खेळ मीच खेळायला देत होते याला. नवऱ्याचा प्रत्येक शब्द तळहाताच्या फोडाप्रमाणे जपला. पण मी कुठे कमी पडले ते मला कधी कळालंच नाही. संशय होता मला समाधानच्या वागण्याचा. म्हटलं संशयाने संसार सुख जातं. संशय नको काय सत्य आहे ते पाहते. मनाला खूप समजावीत होते कि नाही माझा सम्या असं करणार नाही पण.. (ती डोळे पुसत तिथेच बसते. शांतता. प्रिया बेडरूममध्ये जाऊन तिची बॅग भरू लागते. समाधान बेडरूममध्ये जातो.)

समाधान : प्रिया. आय एम सॉरी प्रिया. प्लिज तू जाऊ नकोस.

प्रिया : अरे मी नाही गेले तर ती इथे कशी राहणार?

समाधान : मी दोघींनाही सुखात ठेवेन. (प्रिया समाधानकडे वळून पाहते.)

प्रिया : एक बायको घरी असतानाही पुरुष जेव्हा दुसऱ्या स्त्रीच्या प्रेमात पडतो ना याचा अर्थ समाजाच्या दृष्टीने एकच होतो कि पहिली कुठेतरी कमी पडली. मी ब्लास्टमध्ये मिसिंग होते आणि माझा

नवरा दुसरं लग्न करण्यासाठी दागिने बनवीत होता. (ती बॅग उचलून बाहेर येते.) तुमच्या लग्नाला माझी काही हरकत नाहीये. प्रसाद. तू सुद्धा यांच्या खेळात सामील झालास?

प्रसाद : नाही प्रिया. मी फक्त.

समाधान : प्रसादचा काही दोष नाही प्रिया. आय लव यु बोथ. एक लाख पगार घेतो गं मी. दोघींना पण ठेवेन खुश. (प्रिया त्याच्याजवळ येते.)

प्रिया : खूप उशीर झालाय समाधान आता. तू आनंदी राहा. मला दुसरं काही नकोय. (ती बॅग घेऊन बाहेर जाते.)

प्रसाद : प्रिया. थांब (प्रसाद तिच्या मागून जातो.)

रावसाहेब : तू कसला तमाशा बघतेयस?

नेहा : बाबा

रावसाहेब : थोबाड फोडीन पुढे बोललीस तर. (रावसाहेब नेहाला घेऊन जातो. समाधान डोक्याला हात लावून तिथेच बसतो. आलाप. बेल वाजते. समाधान डोळे पुसत वळतो. कमळी आत येते.)

कमळी : साहेब, डिटेक्टीव्हची बाप आहे हि कमळी. समजलं ना. (प्रियाला आत आणते. मागून प्रसाद येतो.) आता हे तुमचं पार्सल नीट सांभाळा. सगळा मॅटर सॉल्व केलाय आपण. नेहा बाईसाहेबांना त्यांची चूक कळाली. त्या गेल्या त्यांच्या बाबांसोबत. त्यांच्या बाबांनी ठरविल्या ठिकाणी लग्न करतायत त्या. आता या पुढे

तुमचा पाय जरा पण वाकडा पडला ना. तर मग सोलूनच काढते बघा कसा.

समाधान : आय एम सॉरी प्रिया. (तो तिला जवळ घेतो.)

कमळी : प्रसाद साहेब. चला आता आपण जाऊ आपापल्या घरी. साहेब, हि भाजी ठेवा. स्पेशल आहे आजच्यासाठी. शेवग्याची पानं आणि सोबत शेवग्याच्या शेंगा पण आहेत. (कमळी आणि प्रसाद हसत जातात. हळूहळू सगळे लाईट्स जातात. फक्त एकच हलका स्पॉट दोघांवर. दोघे एकमेकांच्या मिठीत.. **हळू हळू पडदा पडू लागतो.)**

!! श्री स्वामी समर्थ !!

सदर पुस्तकातील नाट्यप्रयोगासाठी कृपया आपण **9987311359** किंवा **9324466129** या भ्रमणध्वनी क्रमांकावर अथवा sandeepsurve25@gmail. com या ईमेलवर संपर्क साधावा.

योग्य परवानगीशिवाय प्रयोग केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

**धन्यवाद !**



**संदीप शांताराम सुर्वे.**

**(मुंबई)**

# ई साहित्य प्रतिष्ठान

ई साहित्य प्रतिष्ठान दहा वर्षांपुर्वी सुरू झालं. जगभरात ई पुस्तकांची संकल्पना रुजू लागत असतानाच मराठीतही ई पुस्तकं सुरू झाली. मराठीत अमॅझॉन सारखे प्रचंड इन्व्हेस्ट्मेंट करणारे खिलाडी उतरले. त्यांच्यासमोर ई साहित्य म्हणजे अगदीच लिंबुटिंबू. पण गेली दहा वर्षं आणि आजही गुगलवर “मराठी पुस्तक” किंवा “Marathi ebook” टाकले की ४ कोटी ९३ लाख नांवांमध्ये पहिले दुसरे नाव येते ते ई साहित्यचेच. ही करामत आहे आमच्या लेखकांची. वाचकांना सातत्याने दर्जेदार मनोरंजक उच्च प्रतीची पुस्तके “विनामूल्य” देणारे आमचे लेखक हेच या स्पर्धेचे विजेते आहेत.

मराठीत “साहित्यरत्नांच्या खाणी” निपजोत या ज्ञानोबांनी मागितलेल्या पसायदानाला ईश्वराने तेवढ्याच उदारतेने खाणींचा वर्षाव करून प्रतिसाद दिला. मराठीचे दुर्दैव हे की या खाणींतली रत्ने बाहेर आणणे आणि त्यांचे पैलू पडल्यावर त्यांना शोकेस करणे आणि जागतिक वाचकांसमोर ते पेश करणे यात आपण कमी पडलो. इथे उत्तम साहित्यासाठी भुकेलेले वाचक आणि उत्तम वाचकांच्या प्रतिक्षेतले साहित्यिक यांच्यात ब्रिज बनणे आवश्यक आहे. विशेषतः डॉ. नितीन मोरे यांसारखे साहित्यिक ज्यांना लिहिण्यात आनंद आहे पण त्यापुढील जटील प्रक्रियेत पडण्यात रस नाही अशांसाठी. विदेशांत मोठे लेखक एजंट नेमतात आणि ते बाकी सर्व व्यवहार पहातात. मराठीत ही सोय नाही.

ई साहित्य प्रतिष्ठान ही काही अनुभवी प्रोफ़ेशनल प्रकाशन संस्था नव्हे. पण गेल्या दहा वर्षांत आमच्या हे लक्षात आले की मराठीत रत्नांच्या खाणी आहेत आणि त्यांत उतरून हात काळे करून माती गाळ उपसत राहून जर चिवटपणे काम करत राहिले तर एकाहून एक भारी रत्ने गवसणार आहेत. एखाद्या मोठ्या धनिकाने,

पंडितांच्या सहाय्याने, दरबारी आश्रयासह जर हे काम हाती घेतले तर मराठी भाषेतले साहित्य जागतिक पटलावर आपला ठसा नक्की उमटवेल.

डॉ. नितीन मोरे यांची अकरा अप्रकाशित पुस्तके प्रकाशात आणण्याचा मान ई साहित्यला मिळाला. माधुरी नाईक यांची दहा, शंभू गणपुले यांची नऊ, डॉ. वसंत बागुल यांची बारा, शुभांगी पासेबंद यांची सात, अविनाश नगरकर यांची पाच, रत्नाकर महाजन यांची सहा, शशांक परुळेकर यांची चार, अरुण कुळकर्णी यांची चार अशा अनेकांच्या पुस्तकांना वाचकांपर्यंत नेण्याचे भाग्य ई साहित्यला लाभले. असे अनेक "स्वांतःसुखाय" लिहीणारे उत्तमोत्तम लेखक कवी या मराठीच्या "साहित्यरत्नांचिया खाणीं" मध्ये आहेत. अशोक कोठारे यांनी महाभारताच्या मूळ संहितेचे मराठी भाषांतर सुरू केले आहे. सौरभ वागळे, ओंकार झाजे, पंकज घारे, विनायक पोतदार, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, सुरज गाताडे, निमिष सोनार, सविता नाबर, संजय बनसोडे, आशा पाटील, नासा येवतीकर, निरंजन कुलकर्णी असे अनेक नवीन लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत. ई साहित्य कडे हौशी लेखकांची कमी कधीच नव्हती. पण आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनात प्रगती कशी होईल याकडे लक्ष देणारे लेखक येत आहेत. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

आमेन
सुनील सामंत
ई साहित्य प्रतिष्ठान